# अनुक्रमणिका

**प्रकरण ६ – बँक व्यवसाय, व्यापार व वाणिज्य** ..... १

सावकारी ..... २

सहकारी चळवळ ..... ९

उद्योगांना आर्थिक सहाय्य ..... १८

कृषि अर्थसहाय्य ..... २०

वाणिज्य बँका ..... २०

संयुक्त भांडवली कंपन्या ..... २२

बँक पत योजना ..... २२

आयुर्विमा ..... २२

राष्ट्रीय बचत योजना ..... २३

व्यापार ..... २४

विनियमित बाजारपेठा ..... २४

सहकारी विपणन ..... २८

ग्राहक संस्था ..... २८

राज्य व्यापार आणि रास्त भावाची दुकाने ..... २९

साप्ताहिक बाजार ..... २९

यात्रा ..... ३०

वजने व मापे ..... ३२

तक्ते ..... ३५

# प्रकरण ६ - बँक व्यवसाय, व्यापार व वाणिज्य

प्राचीन काळापासून भारतात विविध प्रकारची देवघेव करणाऱ्या संस्था अस्तित्वात होत्या. बौद्धकाळामध्ये असलेल्या व्यापारी संघाचे वर्णन जातक कथामध्ये आढळते. संस्कृत साहित्यामध्ये श्रेणी, पूंग, संघ इत्यादी नावे आढळून येतात. दक्षिण भारतामध्ये त्यांना मणिग्रामम, नानादेशी अशी नावे आहेत. मणिग्रामम हा वणिकग्रामचा अपभ्रंश असावा. वैदिक साहित्यांतून व्यापारी संघाला वणिक ही संज्ञा होती असे दिसते. विविध व्यापाऱ्यांच्या संघांची विशेष प्रतिष्ठा तत्कालीन राजदरबारात असे. सातारा जिल्ह्यातील कराड जवळील लेण्यांमध्ये उपलब्ध अभिलेखांमधून श्रेष्ठींनी दिलेल्या दानाची नोंद मिळते. साधारणपणे सातवाहन काळात चालणारा व्यापार हा येथे असलेल्या विविध घाटमाथ्यांच्यामधून व लेण्यांच्या पायथ्याजवळून होई. या जिल्ह्यातील बौद्धकालीन लेण्यामध्ये आगाशिव, लोहोर, शिरवळ, बावधन या लेण्यांची झालेली निर्मिती या परिसरातील संपन्न व्यापारी श्रेणींच्या अस्तित्वाची व धनिकांच्या दानाची साक्ष आहे. साधारणपणे राष्ट्रकूट-यादव काळात येथील व्यापार हा जैन व लिंगायत वैश्यांच्याकडे असावा. यातूनच फलटण येथील जबरेश्वर मंदिरासारख्या वास्तूची निर्मिती झाली. तर पाटेश्वर, मल्केश्वर, कौंडल, राजापुरी येथील शैव लेण्यांचा विकास झाला.

महाराष्ट्राच्या नागरी व ग्रामीण भागामध्ये शिवपूर्व काळात किंबहुना त्याच्याही बऱ्याच आधीपासून लहान प्रमाणामध्ये वाणिज्य व तत्सम व्यवसायावर उपजीविका करणारे लोक होते. प्राचीनकाळी वस्तुविनिमय प्रचलित होता. तो पुढेही बलुतेदारी सेवेच्या माध्यमातून बऱ्याच मोठ्या प्रमाणात रूढ असावा. यातून स्थानिक गरजा भागविण्यासाठी इतर प्रदेशांशी संपर्क साधून जी आयात-निर्यात होई त्यासाठी हुंडी पाठविणाऱ्या व सोडविणाऱ्या व्यापारी पेढ्याही अस्तित्वात होत्या. वस्तूविनिमय करताना तो उत्पादक व ग्राहक यांच्यातच होत असे. यांच्यात मध्यस्थी करणारा दलाली वर्ग मोठ्या प्रमाणात मध्ययुगापर्यंत अस्तित्वात नव्हता.

महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराजांनी १७ व्या शतकात स्वराज्य निर्माण केले. स्वराज्याच्या स्थापनेमुळे महाराष्ट्रात घडून आलेल्या राजकीय, सामाजिक क्रांतीतून एतदेशियांना अनेक क्षेत्रात पुढे सरसावण्याची संधी प्राप्त झाली. सावकारी व व्यापाराची संधी ही त्यापैकीच एक होती. या काळात येथे शेटे, महाजन यांचा एक मोठा वर्ग उदयाला आला. वैश्य व्यापाऱ्यांबरोबरच या वेळी मराठा, कुणबी व वाणीही पुढे आले. एखाद्या भागाचा आर्थिक विकास कसकसा होत गेला हे पहात असताना त्या परिसरात विकसित झालेल्या स्थानांचा आलेख, वास्तुंची निर्मिती यांचा विचार करणे उपयुक्त ठरते. सातारा जिल्ह्यामध्ये यादव काळामध्ये पुढे आलेल्या स्थानांचाच कमी अधिक प्रमाणात विकास १७ व्या व १८ व्या शतकात झाल्याचे दिसते. साधारण १७ व्या शतकात या भागात प्रतापगड, सज्जनगड, अजिंक्यतारा यासारख्या अन्य किल्ल्यांचा विकास झाला. यावेळी निर्माण झालेल्या राजकीय प्रभूसत्तेचा परिणाम म्हणून येथे वाठार, वाई, माहुली, फलटण, मेणवली यासारखी अनेक स्थाने नव्याने पुढे आली. येथे स्थानीय कमाविसदारांनी सावकारीचा व्यवसायही सुरू केला. सरकारलाही कर्ज देण्याची तयारी असलेल्या या सावकार व वतनदारांनी बांधलेल्या हवेल्या व वाडे आजही अवशेष रुपात आपण पाहू शकतो.

सन १७५० च्या सुमारास साताऱ्यात एतदेशीय मराठी सावकारांबरोबरच अन्य राज्यातील सावकारांचे प्रमाणही नजरेत भरण्यासारखे होते. त्यांच्या पेढ्यांमधून व्यापार चाले. सातारच्या छत्रपती शाहू महाराजांनी कान्होजी आंग्रेच्या मार्फत उत्तम इंग्लिश सुरे, तलवारी, हस्तिदंत, गुलाबी अत्तराच्या

अनुक्रमणिका

बाटल्या, मेणबत्या, आगारू, तंबाखू, कस्तुरी, शोभेची दारू या वस्तू मागवल्याचा उल्लेख आहे. असे असले तरी स्थानिय शेठ सावकारांची संपन्नता त्यांनी उभारलेल्या वास्तूतून एका मर्यादित अर्थांनी तरी व्यक्त होते. येथील मध्ययुगीन शिलालेखांच्यामधून स्थानिक दात्यांची नावे उपलब्ध होतात. १८ व्या शतकात एकूणच महाराष्ट्रामध्ये मोठ्या प्रमाणात उदयाला आलेल्या मराठी व्यापारी सावकारी वर्गात सर्वच जाती जमातींचे लोक सहभागी असल्याचे दिसते.

## सावकारी

शिवकाळात शेरे, महाजन, देशकुलकर्णी, देशमुख हे वतनदार लोक गरजूंकडून कर्जकतबा (करारनामा) लिहून घेऊन व्याजाने पैसा देत. यासाठी ऋणकोला जामीन द्यावा लागे, न्यायालयातील दाव्यांचा खर्च भागविणे, योगक्षेम चालविणे, दंड भरणे, खंडणी देणे इत्यादी कारणांसाठी कर्जे काढली जात. जामीनावरील कर्जावर १५ टक्के तर जामीन नसलेल्या कर्जावर ६० टक्के व्याज आकारले जाई. ब्राह्मणास इतरांपेक्षा कमी व्याजाने कर्ज मिळे. दीर्घ मुदतीच्या कर्जाच्या व्याजाचा दर जबर असे. सरकारकडून शेतकऱ्यांना कर्ज मिळत असे. पण शेती व्यवसायासाठी घेतलेल्या कर्जावर व्याज आकारले जात नसे. "वरात" म्हणजे "हुंडीचा" अधिकाऱ्यांचे पगार देण्यासाठी शिवाजी राजे वापर करीत असत. तालुक्याच्या खजिन्यावर ही हुंडी काढण्यात येई आणि त्यामार्फत अधिकाऱ्यांना पैसा मिळत असे. शिवकालीन महाराष्ट्रात सोने, चांदी, आणि तांब्याची नाणी प्रचलित होती. [**अ. रा. कुलकर्णी, "शिवकालीन महाराष्ट्र", मराठ्यांचा इतिहास**, खंड १, पृ. ३६०-६१.] सर्वच नाणी महाराष्ट्रात पाडलेली नव्हती. मुघल राजवट, विजयनगरची हिंदू राजवट, तसेच पोर्तुगीज आणि इंग्रजांनी पाडलेली नाणी महाराष्ट्राच्या बाजारपेठांतून वापरली जात होती.

नाण्यांमध्ये विविध प्रकार असत. सोने, तांबे व चांदी या धातूपासून नाणी बनवत. नाणे तयार करत त्या स्थानाला टांकसाळ म्हणत. अशा टांकसाळी प्रत्यक्ष राजा चालवित नसे. खजिन्यात पुढील प्रकारची चलनी नाणी असल्याची नोंद मिळते. मोहोर, पुतळ्या, शिवाई, अच्युतराई, धारवाडी, देपराई, होण- सतलाम्या इभाईम्या इत्यादी असत. या शिवाय असुर्फी किंवा अश्राफी, हे चांदीचे नाणे होते. मोहोरेची किंमत १४ रुपये व एका होनाची तीन ते चार रुपये असे. चांदीचा रुपया १८० ग्रेन वजनाचा (११ ग्रॅम) असे. तांब्याचे शिवराई हे चलन प्रचारात होते. त्यावर "श्री राजा शिवछत्रपती" असा कोरीव लेख असे. विशिष्ट सरकारी पट्टी घेऊन सावकार व सोनार पेढ्यांना नाणे पाडण्याची परवानगी मिळे. [**वि. त्र्यं. गुणे "शिवाजी महाराजांचे राज्य, सीमा आणि प्रशासन" मराठ्यांचा इतिहास**, खंड १, पृ.. २८९-२९०.]

साताऱ्याचे पहिले छत्रपती शाहू यांच्या कारकिर्दीत धावडशीचा ब्रम्हेंद्रस्वामी एक मोठा सावकार होता. त्याने पेशव्यांना व इतर सरदारांना कर्जे दिली होती. याच कालावधीत साताऱ्यामध्ये मोरशेट करजे हा मोठा सावकार होता.त्यानेही पेशव्यांना कर्ज दिले होते. सन १७५३-५४ मध्ये मराठ्यांनी श्रीरंगपट्टणवर दहा लक्ष नऊशे रुपयांची खंडणी आकारली होती आणि साताऱ्यातील बारा सावकारी पेढ्यांच्या नावाने ती रक्कम हुंड्यांच्या रुपाने मिळविली होती. या बारा सावकारांमध्ये नऊ गुजराती व दोन कन्नड लिंगायत सावकार होते. [**वा. द. दिवेकर, "पेशवे कालीन महाराष्ट्र : आर्थिक जीवन", मराठ्यांचा इतिहास**, खंड २, १९८५ पृ. ३५६, ३५७.] गोपाळ नाईक तांबवेकर हा गृहस्थ सावकारी करी त्याने पेशवे व बडोद्याचे राजे गायकवाड यांना कर्जे दिली होती. कर्जाच्या फेडीबद्दल गायकवाडांनी त्याला १६,००० रुपये इनामाचे एक गाव दिले होते. [**गो. रा. माटे, असा घडला सातारा जिल्हा**: इ. स. १६०० ते १९००, पृ. ३७.] सन १७५० च्या सुमारास साताऱ्यात मराठी ब्राम्हण सावकार

फारच कमी होते. परंतु गुजराती सावकार तुलनेने अधिक होते. पुण्यातील रास्ते आणि अनगळ हे पेशव्यांचे सावकार अनुक्रमे वाई आणि साताऱ्यात येऊन स्थायिक झाले होते.

वाठारच्या (निंबाळकरांचे) कुशाजी नामक सावकाराने आपल्या व्यवसायातून प्रचंड द्रव्य संपादन केले होते. कुशाजीजवळ किती द्रव्य होते याचा नक्की अंदाज करणे कठीण आहे, त्याने पेशवे यांना मोठमोठ्या रकमा कर्जाऊ दिल्या होत्या.

सन १८७८ मध्ये परवाना करनिर्धारण दस्तऐवजांनुसार १०० रुपयांपेक्षा अधिक वार्षिक उत्पन्न असलेले जिल्ह्यातील भांडवलदार (ज्यात बहुतांश मोठे जमीनदार व सावकार असत) आणि व्यापाऱ्यांची संख्या १९,८२३ होती. त्यापैकी ९,८८७ चे १०० ते १५० रुपये; ४,०३३ चे १५० ते २५० रुपये; २,३१६ चे २५० ते ३५० रुपये; १,०५१ चे ३५० ते ५०० रुपये; ९५८ चे ५०० ते ७५० रुपये; ५६० चे ७५० ते १,००० रुपये; ३२७ चे १,००० ते १,२५० रुपये; १५१ चे १,२५० ते १,५९० रुपये; १७६ चे १,५०० ते २,००० रुपये; १२१ चे २,००० ते ३,००० रुपये; १०५ चे ३,००० ते ४,००० रुपये; ४६ चे ४,००० ते ५,००० रुपये; ४९ चे ५,००० ते ७,५०० रुपये; १९ चे ७,५०० ते १०,००० रुपये आणि २४ चे १०,००० रुपयांपेक्षा अधिक वार्षिक उत्पन्न होते. सन १८७९ पासून ५०० रुपयांपर्यंत वार्षिक उत्पन्न असणाऱ्यांना परवाना करात सूट देण्यात आली. सन १८८१-८२ मध्ये करनिर्धारणासाठी २,६६१ भांडवलदारांचे वार्षिक उत्पन्न ५०० रुपयांपेक्षा अधिक होते. त्यातील १,१४९ चे वार्षिक उत्पन्न ५०० ते ७०० रुपये; ४५६ चे ७५० ते १,००० रुपये; ३४३ चे १,००० ते १,२५० रुपये, १६१ चे १,२५० ते १,५०० रुपये; १६७ चे १,५०० ते २,००० रुपये; १५४ चे २,००० ते ३,००० रुपये; ९१ चे ३,००० ते ४,००० रुपये; ५१ चे ४,००० ते ५,००० रुपये; ४८ चे ५,००० ते ७,५०० रुपये; १५ चे ७,५०० ते १०,००० रुपये आणि २६ चे १०,००० रुपयांचेवर होते. [**सातारा गॅझेटिअर**, १८८५, पृ. १७८.]

जिल्ह्यात नियमित स्वरुपाच्या सावकारी पेढ्या नसल्या तरी चांगले नावलौकिक असलेले सावकार अथवा भांडवलदार यांच्याकडे लोकांच्या ठेवी ठेवलेल्या असत व त्यांना वार्षिक तीन टक्के दराने व्याजही दिले जाई.

हुंडी आणि पतपत्राचे (भलावणपत्र) दर्शनी हुंडी आणि मुदती हुंडी असे प्रकार प्रचलित होते. त्वरित वटविल्या जाणाऱ्या हुंडीस दर्शनी व मुदतीअंती वटविल्या जाणाऱ्या हुंडीस मुदती हुंडी म्हणत. मुदती हुंडीवर महिन्यास एक ते दोन टक्के फरकाने सूट दिली जात असे. व्यापारी उलाढालीतील माल घेणारा व्यापारी माल देणाऱ्यास रोखे वटविण्याच्या ठरवून दिलेल्या मुदतीसाठी दीर्घ मुदतीची हुंडी लिहून देत असे. मुंबईच्या हुंड्या बहुधा अकरा दिवस मुदतीच्या असत व त्यावर मुदतीच्या आत वटवणीसाठी अर्धा ते पाऊण टक्का सूट दिली जात असे. जिल्ह्यात ३,००० ते ७,००० रुपयांपर्यंतच्या मोठ्या हुंडींचा व्यवहार होत असे. मात्र या हुंडींचा व्यवहार करीत असलेल्या फार थोड्या व्यापारी संस्थांचे भांडवल एक लाख रुपयांपेक्षा अधिक होते.

ब्रिटिश अमदानीत जिल्ह्यात इंपिरिअल रुपया चलनात होता. इंपिरिअल रुपया चलनात येण्यापूर्वी त्याच्या ९२.६ टक्के किंमतीचा चांदोर रुपया व ९७ टक्के किंमतीचा अंकुशी रुपया चलनात होता. सन १८८४ पर्यंत ग्रामीण भागातील काही श्रीमंत व्यक्ती व सावकारांकडे चांदोर व अंकुशी रुपये देखील आढळत.

समाजातील २० ते ३० टक्के लोक सधन असून ते इच्छेनुसार बचत करीत. उर्वरित लोकांमध्ये उत्पन्नापेक्षा जास्त खर्च करणाऱ्या शेतकरी वर्गाचा समावेश होता. मारवाडी, गुजराती, लिंगायत वाणी व ब्राह्मण व्यापारी दरवर्षी बचत करीत असत. तथापि, त्यापैकी मोजकेच लोक संपत्ती जमवू शकत. बहुतांश सर्व बचत कौटुंबिक आणि धार्मिक समारंभावर उधळली जाई. मोठे सावकार व उच्च श्रेणीचे शासकीय अधिकारी आपला सर्व खर्च भागवून नफ्याच्या आणि निव्वळ उत्पन्नाच्या सुमारे एक तृतियांश रक्कम बचत करीत.

जिल्ह्यामध्ये काही मोठ्या व्यापारी संस्था होत्या. बहुतांश प्रमुख संस्था मुख्यत्वे शेती मालाची निर्यात किंवा स्थानिक धान्याची विक्री करीत. स्थानिक उच्च पदस्थ अधिकाऱ्यांशिवाय काही व्यक्तीच संयुक्त भांडवल कंपन्या व शासकीय रोखे (प्रतिभूती) किंवा बचत बँकामध्ये गुंतवणूक करीत. सन १८७०-७१ मध्ये बचत बँक ठेवी २०,१६० रुपये होत्या. त्यात वाढ होऊन १८७५-७६ मध्ये ३५,९५० रुपये आणि १८८२-८३ मध्ये ६६,२८० रुपये झाल्या. शासकीय रोखे धारकांना १८७०-७१ मध्ये १,३५० रुपये १८७५-७६ मध्ये १,३३० रुपये व १८८२-८३ मध्ये २,८१० रुपये व्याज मिळाले. व्यापारी वाढीव भांडवलाचा उपयोग व्यापार वृद्धीसाठी करीत. ते नवीन व्यापारात क्वचितच गुंतवणूक करीत.

व्यापारी बचतीचा उपयोग दुकानाचा दर्जा वाढविणे व गोदामाचा विस्तार करण्यासाठी करीत. घरभाडे मिळण्याच्या हेतुने घरांची क्वचित खरेदी केली जाई. भाड्याने देण्यासाठी घरे बांधत नसत. अशा प्रकारची गुंतवणूक पारशी व बोहरा लोक करीत व त्यांच्या बंगल्यांमध्ये युरोपियन लोक भाड्याने राहात असत. सधन लोक आपला ऐषआराम व प्रतिष्ठेसाठी भव्य वाडे बांधीत. भव्य वाडा असणे हे श्रीमंतीचे प्रतीक मानले जाई. सरकारी किंवा खाजगी जमीनधारकांचे वास्तव्य जमीन असलेल्या गावी असो अथवा नसो ते त्या गावात आपल्या मालकीचे मोठे घर असणे प्रतिष्ठेचे मानीत.

इतर सधन लोक जमिनीत गुंतवणूक करणे पसंत करीत. जिल्ह्यातील स्थानिक व्यापारीसुद्धा जमिनी विकत घेण्यास उत्सुक असत. जमिनीत गुंतवणूक करणे समाजात प्रतिष्ठेचे मानले जात असे. मोठे वकील, सरकारी कर्मचारी किंवा पुरोहित यांच्यापैकी बहुतेकांकडे स्वतःची जमीन असे. कारखान्यांमधील उत्पादनामध्ये होत असलेली घट, रोख्यांची घसरण, युद्ध व चोरांपासून वाटणारी भिती व शेती उत्पादनाच्या किंमतीमध्ये झालेली वाढ यामुळे ब्रिटिश राजवटीमध्ये जमिनीत गुंतवणूक करण्याकडे लोकांचा अधिक कल होता. ब्रिटिश कायद्याचा अंमल सुरू झाल्यानंतर मिरासदारी पद्धती नष्ट झाली. त्यामुळे सर्वसामान्य लोकांना शेतीमध्ये पैसा गुंतविणे सुलभ झाले. ब्रिटिश अमलात शेतसारा निर्धारित करण्यात आला. त्यामुळे पूर्वीच्या राजवटींमध्ये आकारला जाणारा जबर शेतसारा व सरकारी अधिकाऱ्यांकडून व गाव प्रमुखाकडून जबरदस्तीने महसूल जमा करण्याच्या प्रवृत्तीला आळा बसला. बागायती व कोरडवाहू जमिनीच्या एका एकरास जास्तीत जास्त अनुक्रमे १,००० रुपये व ३०० रुपये किंमत येत असे. क्वचित जमीनदार आपल्या जमिनीवर सावकारांकडून कर्ज घेत असत. सावकार कर्जदारांच्या जमिनी ताब्यात घेत. तसेच ते सरकारी भाडेपट्टीने दिलेल्या जमिनीतील उत्पन्नाचा मोठा हिस्सा घेत. सर्वसाधारणपणे अशा नोंदी सरकारी दप्तरात आढळून येत नसत. वस्तुतः ३३ प्रतिशत कसण्यास योग्य अशा जमिनी सावकारांच्या ताब्यात गेल्या होत्या. गैरमार्गाने सावकारांच्या ताब्यात गेलेल्या जमिनींची संख्या अधिक होती. सन १८७६ च्या दुष्काळाच्या काही वर्षे अगोदर जिल्ह्यातील जवळजवळ संपूर्ण कसण्यास योग्य जमीन लागवडीखाली होती. या दुष्काळात व नंतरच्या काळात जमिनीचे बरेच क्षेत्र पडीक राहिले होते. अशा पडीक जमिनींपैकी बहुतांश जमिनी शासनाने वनसंवर्धनासाठी तर जमीनदारांनी

लागवडीसाठी घेतल्या होत्या.

सावकारी हा गुंतवणुकीचा एक सर्वसामान्य प्रकार होता. सावकारीचा व्यवसाय कमी अधिक प्रमाणात सर्व समाजातील लोक करीत. सुतार, लोहार, महार, चांभार आणि वडार जतींतील लोकसुद्धा पैसे व्याजाने देत असत. अव्यावसायिक सावकारांत शिंपी व कासार यांची संख्या अधिक होती. व्यावसायिक सावकारांमध्ये ब्राह्मण, गुजराती वाणी, मारवाडी वाणी, जैन, लिंगायत, मराठा व मुसलमान यांचा अधिक भरणा होता. प्रामुख्याने सावकारी व्यवसाय करणाऱ्यांची संख्या अल्प होती. ब्राह्मणांमध्ये शेतकरी, जमीनदार, व्यापारी, सेवानिवृत्त शासकीय कर्मचारी व वकील होते. त्यातील काहींकडे मुबलक प्रमाणात भांडवल असल्यामुळे ते व्यापाराबरोबर सावकारीही करीत. कराडमधील काही ब्राह्मण वंशपरंपरागत सावकार होते. ते सावकारीतून खूप नफा मिळवत असत. गुजराती, लिंगायत व मारवाडी वाणी यांच्यापैकी बहुसंख्य लोक व्यापारी असत. काही लोक जमीनदारही होते. ते शहर व खेड्यातून कापड, धान्य व किराणा व्यापार करीत. साताऱ्यात गुजराती वाणी मुख्यत: तूप व तेलाचा व्यापार करीत. मराठा व कुणबी सावकार लोक जमीनदार असत. काही मुसलमान सावकारांची खेड्यात दुकाने होती. मारवाडी वाणी सावकार म्हणून प्रसिद्ध होते. ते आपल्या ऋणकोशी कठोर वर्तन करीत. मारवाडी वाणी जिल्ह्यातील मूळ रहिवाशी नसल्यामुळे ते आपल्या मूळ गावाशी संबंध ठेवून असत. ते म्हातारपणी किंवा उपजीविकेपुरता पैसा जमा झाल्यानंतर आपल्या मूळ गावी परत जात. नवीन येणारा मारवाडी सुरुवातीस मारवाडी सावकाराचा गुमास्ता किंवा प्रतिनिधी म्हणून व्यवसाय सुरू करीत असे. पुरेसे भांडवल जमा झाल्यानंतर तो स्वतंत्ररित्या किंवा इतर मारवाडी व्यापाऱ्यांबरोबर भागीदारीत सावकारीचा व्यवसाय सुरू करी. मारवाड्यांच्या खालोखाल गुजराती वाणी व स्थानिक ब्राह्मण सावकार होते. गुजराती वाणी गुजर या नावाने ओळखले जात. सामान्यत: गुजराती सावकार मारवाड्याइतकेच व्याज घेत, तरी ते ऋणकोशी तितके कठोर वर्तन करीत नसत. स्थानिक ब्राह्मणांमध्ये देशस्थ, गोलक, कऱ्हाडे, कोकणस्थ व तिरगुळ शाखेचे लोक सावकारी करीत. त्यापैकी देशस्थ व गोलक प्रमुख सावकार होते. जैन, लिंगायत, मराठा व मुसलमान सावकार फार कठोरपणे वागत नसत. मारवाडी व गुजराती वाणी सोडून मोठे सावकार व जमीनदार ऋणकोंशी सलोख्याने वागत. लहान सावकार ऋणकोंशी कठोर वर्तन करीत.

मोठे सावकार आपला व्यवहार हुंडीच्या स्वरुपात व योग्य त्या तारणावरच करीत. मोठे जमीनदार सदैव त्यांचे कर्जदार असत. ऋणकोस सदैव कर्जात ठेवणे सावकारांना फायद्याचे असे. हुंड्या वटविणारे पेढीवाले इतर सावकारांबरोबर व्यवहार करीत. ते अधिक चांगली पत असलेल्या सर्वसामान्य लोकांशी कर्जाचे व्यवहार करीत. एखाद्या वेळी कर्जाऊ रक्कम परत न मिळाल्यास ते खाजगी बेलिफामार्फत ऋणकोच्या घरासमोर धरणे धरीत अथवा सक्तीने वसुली करीत. दिवाणी न्यायालयाची स्थापना झाल्यानंतर या प्रथा बंद झाल्या. सावकार दिवाणी वादावरील खर्च टाळण्यासाठी व चांगले संबंध ठेवण्यासाठी ते ऋणकोकडून कर्जाचा मोठा हिस्सा वसूल झाल्यानंतर उर्वरित कर्जातून काही रक्कम सूट देत. या वर्गातील सावकार खंडमुक्त जमीनधारकांना व विशेषत: जिल्ह्यात वंशपरांपरागत असलेल्या अधिकाऱ्यांना गहाणवटीवर मोठ्या रकमा आगाऊ देत. अनेक कुटुंबांना पिढ्यान पिढ्या सावकारांची देणी असत. वंशपरंपरागत सावकारांची देणी असणाऱ्या उच्च वर्गातील काही ऋणकोंनी सरकारकडे तक्रार केल्यानंतर सरकारने वंशपरंपरागत वहिवाटीखालील जमिनी हस्तांतरणास प्रतिबंध केला. मध्यम वर्गातील सावकार खतावणी व दैनिक वहीत व्यवहारांची नोंद ठेवीत. त्यांचे भांडवल रुपये १०,००० ते ३०,००० पर्यन्त असे. लहान सावकार अत्यल्प भांडवलावर व्यवसाय करीत. ते पेढीवाल्या सावकारांकडून कर्ज घेऊन गरिबांना जास्त व्याजाने कर्ज देत. या वर्गातील सावकारांच्या अटी अधिक जाचक असत व ते

अनुक्रमणिका

नोंदीमध्ये फेरफार करीत. त्यापैकी सधन सावकार व्यवहाराची नोंद कच्च्या नोंद वहीत व खतावणीमध्ये ठेवित. न्यायालयात जेव्हा हिशेब सादर करण्याचा प्रसंग येई त्यावेळी वाद टाळण्यासाठी ते त्यावर ऋणकोची सही घेत.

कर्जाऊ दिलेली रक्कम, परत फेडीचा कालावधी व त्यावेळची परिस्थिती, ऋणकोची आर्थिक स्थिती व कामाची निकड लक्षात घेऊन व्याजाचा दर वेगवेगळा ठरविला जाई. तदनुसार तारणावर कर्ज देताना तारण ठेवलेल्या वस्तूंची किंमत ठरवून व्याजाचा दर आकारित. परिवर्तनीय जंगम मालमत्ता व स्थावर मालमत्तेच्या तारणावर मोठी रक्कम ६ ते १२ टक्के वार्षिक व्याज दराने दिली जात असे. लहान रकमेसाठी साधारण तारणावर व्याजाचा दर १८ टक्के असे. प्रतिष्ठित व्यक्तीस स्वत:च्या जबाबदारीवर दिलेल्या रकमेवर ९ टक्के व्याज आकारले जाई. क्वचित प्रसंगी निराश्रितांना कर्ज दिले जाई. सर्वसाधारणपणे शेतकऱ्यांना अनिश्चित स्वरुपाच्या तारणावर दिलेल्या कर्जावर २४ ते ४० टक्के व्याज आकारले जाई. हा व्याजाचा दर १८८३ मध्ये प्रचलित होता. अशीच परिस्थिती १८७६-७७ मध्ये पडलेल्या दुष्काळापूर्वी होती. सन १८६३ मध्ये सावकार करारपत्रामध्ये नमूद केलेल्या रकमेतून २ ते ५ टक्के रक्कम नजराणा (मनोती) म्हणून घेत. ही पद्धत बंद करण्यात आली. तरीसुद्धा खाजगीत काही व्यवहार चालत असत. क्वचित करारपत्रात व्याज दराच्या व्यवहाराच्या नाममात्र नोंदी ठेवल्या जात. ऋणकोने व्याजाचा हप्ता न दिल्यास सावकार त्याच्या शेतातील उत्पादनातून व्याज वसूल करीत असे. ऋणकोस आपल्या जमिनीचा महसूल भरण्यासाठी कर्ज घ्यावे लागे. त्यामुळे ऋणकोचा शेतीच्या उत्पन्नाचा बराचसा भाग व्याजापोटी जात असे. [**सातारा गॅझेटिअर**, १८८५ पृ. १८१-८६ मध्ये अधिक माहिती दिलेली आहे.]

सावकार जवळपासच्या खेड्यातील शेतकऱ्यांना पैशांच्या व्यवहाराबरोबरच धान्यही कर्जाऊ देत. बहुतेक खेड्यातील किराणा दुकानदार सावकारीचाही व्यवसाय करीत. ते आपल्या दुकानांमध्ये कापड, धान्य, कडधान्ये, साखर व इतर गरजेच्या वस्तू ठेवीत. घेतलेल्या कर्जाऊ पैशासाठी करारपत्र केले जाई. अशा करारपत्रामध्ये घेतलेल्या रकमेपेक्षा जास्त रकमेच्या नोंदी केल्या जात. गिऱ्हाईक (ऋणको) घेतलेल्या पैशांच्या नोंदी ठेवीत नसत. त्याचा फायदा दुकानदार घेत. करारपत्र करून रक्कम घेण्याचा व्यवहार खेड्यापेक्षा शहरांमध्ये जास्त चालत असे. सावकाराकडून घेतलेले धान्य काही पटीत परत करावे लागे. [**सातारा गॅझेटिअर**, १८८५ पृ. १८६.] जूनमध्ये पावसाळा सुरू झाल्यापासून ऑक्टोबर किंवा नोव्हेंबरपर्यंत शेतकऱ्यांना धान्य उसनवार दिले जात असे. पूर्वी धान्य उसनवार घेताना करारपत्र करण्याची पद्धती नव्हती. परंतु ब्रिटिश राजवटीमध्ये धान्य कर्जाऊ घेताना करारपत्राची पद्धती सुरू झाली. अशा करारपत्रावर रकमेची नोंद करून त्या किमतीचे धान्य किंवा वस्तू परत करण्याच्या नोंदी केल्या जात. सर्वसाधारणपणे परत करावयाची रक्कम धान्याच्या स्वरूपात दिली जात असे. या व्यवहारात २५ ते ५० टक्क्यांपर्यंत वाढीव धान्य द्यावे लागत असे. क्वचित प्रसंगी ७५ टक्क्यांपर्यंतही धान्य द्यावे लागे. गरीब शेतकऱ्यांना ही पद्धती अतिशय जाचक होती. सावकार आपले अग्रिम धान्य नवे पीक येताच वसूल करीत. ही पद्धती साठेबाज व्यापाऱ्यांना अधिक लाभदायक होती.

सातारा जिल्हा ब्रिटिश राजवटीखाली आल्यानंतर व्यापारामध्ये व साधनसामग्रीमध्ये वाढ झाली. परंतु शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा कमी झाला नाही. पूर्वीपेक्षा मराठा राजवटीमध्ये कर्जासाठी जमीन गहाण ठेवता अथवा विकता येत नसे. सावकार कर्जदारांची जमीन विकत घेत असत. तथापि, कर्जाच्या मूळ रकमेवरील व्याजाच्या वसुलीस ते उत्सुक असत. सावकार प्रतिष्ठित लोकांना कर्ज देतांना सहानुभूती दाखवीत. कर्ज परत मिळण्याची निश्चिती नसेल तर सावकार तारणाशिवाय कर्ज देत नसत. ब्रिटिश

राजवट सुरू झाल्यावर जिल्ह्यात महसूल जमाबंदी कायदा लागू करण्यात आल्यामुळे महसुलाच्या मागणीत २० ते ३० टक्क्याहून अधिक घट होऊन जमीनमालकांची पत वाढली. सन १८६५ च्या भूमापन कायद्यानुसार जमीन मालकांना जमीन विकण्याचा किंवा गहाण ठेवण्याचा हक्क मिळाल्याने त्यांची पत अधिकच वाढली. अमेरिकन यादवी युद्धामुळे (१८६१-१८६५) शेतमालाच्या किंमती वाढल्यामुळे जमीन मालकाची पत अधिकच वाढली होती. जमीनदार मोठमोठ्या रकमा कर्जाऊ घेत. जमिनीच्या किंमती वाढल्याने सावकार जमीनधारकांना कर्ज काढण्यास प्रोत्साहन देत. याच सुमारास सावकारांचा एक नवीन वर्ग उदयास आला. सन १८७७ मध्ये पारित झालेल्या सिव्हील प्रोसिजर कोडमुळे सावकार आपले कर्ज सुलभरित्या वसूल करू शकत होते. तसेच कर्जबाजारींची जुनी वंशपरंपरागत कर्जे यांचा बोजा कमी करण्याच्या सद्हेतूने इंग्रजांनी १८६९ मध्ये लागू केलेला लिमिटेशन ॲक्ट सावकारांनी आपल्या फायद्यासाठी धूर्तपणे उपयोगात आणला. त्यानुसार तीन वर्षाच्या मर्यादेनंतर कर्जदाराला आपली जमीन सावकाराला देऊन टाकावी लागे अथवा चक्रवाढ व्याजासह संपूर्ण रक्कम परत करण्याचा करारनामा करावा लागे. त्यातच १८७३-७४ मध्ये शेती मालाच्या व शेतजमीनीच्या किंमती घसरल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण होऊन त्याचे पर्यावसन १८७५ च्या उद्रेकात झाले. [कित्ता, पृ. १८७.] हा उद्रेक "डेक्कन रॉयट्स" या नावाने प्रसिद्ध आहे. तथापि, पुणे व नगर जिल्ह्यांच्या तुलनेत साताऱ्यात अशा दंग्याचे प्रमाण कमी होते. तरीसुद्धा डेक्कन रॉयट्स कमिशनच्या अहवालानुसार पुणे व अहमदनगर जिल्ह्यांसमवेत सातारा जिल्ह्यासही डेक्कन ॲग्रिकल्चरिस्ट डेटर्स रिलीफ ॲक्ट, १८७९ लागू करण्यात आला.

सन १८७६-७७ मध्ये पडलेल्या दुष्काळामुळे माण, खटाव व खानापूर उपविभागातील काही जमिनींची मशागत होऊ शकली नाही. अशा जमिनी पूर्वीच्याच शेतकऱ्यांच्या नावे होत्या. त्यातील काही जमिनी सावकारांकडे गहाण होत्या. गहाण ठेवलेल्या जमिनीतील उत्पन्नाचा काही भाग व्याजाबद्दल सावकारास द्यावा लागे. मराठा किंवा लिंगायत सावकार अशा जमिनी स्वत: कसत. परंतु ब्राह्मण, गुजराती व मारवाडी सावकार अशा जमिनी खंडाने कसावयास देत. उत्पन्नाचा ७५ टक्के हिस्सा जमिनमालकास मिळत असे.

डेक्कन ॲग्रिकल्चरल डेटर्स रिलिफ ॲक्टनुसार जंमीन विकण्यास प्रतिबंध करून जमिनीची नोंद करणे सक्तीचे करण्यात आले. जमिनीची देवाणघेवाण करणाऱ्यांची वैयक्तिक चौकशी करण्यासाठी सावकार व जमीन मालकांमध्ये लवाद नेमून समेट घडविला जांत असे. न्याय रकमेचे सुलभ हप्ते ठरविले जात. या कायद्याचा मुख्य परिणाम म्हणजे न्यायालयात जाण्यास प्रतिबंध बसला. शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा कमी व्हावा व त्यांच्या जमिनी व मालमत्तेवर सावकारांकडून जप्ती आणली जाऊ नये हा या कायद्याचा मुख्य उद्देश होता.

मराठा काळात जिल्ह्याच्या दक्षिण व दक्षिण-पूर्व भागात कर्जाच्या बदल्यात वेठबिगारी करण्याचीही प्रथा असल्याचे इंग्रजांनी लिहून ठेवले आहे. सधन कुटुंबे श्रमाच्या तारणावर मजुरांना कर्ज देत असत. मजुरीवर काम करणारे कामगार हे नेहमी सावकार व मोठे जमीनदारांकडून सेवेच्या तारणावर लग्न इत्यादी धार्मिक कार्यासाठी कर्ज घेत असत. घेतलेले कर्ज परत करण्यास तगादा लावल्यास असे मजूर सावकार, जमीनदार व प्रतिष्ठित व्यक्ती यांच्याकडे चाकरीस राहत. अशा मजुरांना महिना दीड किंवा दोन रुपये पगार दिला जाई. त्यांना १०० रुपयाच्या कर्जासाठी पाच वर्षे मालकाची चाकरी करावी लागे. आगाऊ रक्कम देऊन सर्व दिवस मालकाकडेच काम करीन असा लेखी करार मजुरांकडून करून घेत असत. घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीपूर्वी मृत्यू आल्यास किंवा अपंगत्व आल्यास या कर्जाची परतफेड

कर्जदाराच्या वारसास आपली सेवा देऊन करणे बंधनकारक असे. ही पद्धत साताऱ्याच्या छत्रपतींच्या कारकिर्दीत बंद करण्यात आली.

मुंबई इलाख्यात १९४६ पूर्वी सावकारी व्यवसायावर आवश्यक नियंत्रण ठेवणारा कायदा नव्हता. त्यासाठी मुंबई इलाख्यात मुंबई सावकार अधिनियम (सावकारी सनद), १९४६ संमत करण्यात येऊन तो सातारा जिल्ह्यास १७ सप्टेंबर १९४७ रोजी लागू करण्यात आला. स्वातंत्र्योत्तर काळात बँक व्यवसायातील प्रगती आणि ग्रामीण पतपुरवठा सुविधेत लक्षणीय वाढ झाल्याने अधिकृत सावकारांच्या संख्येत घट झाली. सन १९७५-७६ मध्ये जिल्ह्यात १४८ अधिकृत सावकार होते, तर १९८०-८१ मध्ये त्यांची संख्या केवळ ८० राहिली.

सन १९४७-४८ मध्ये अधिकृत सावकारांनी दिलेले कर्ज ३०,१२,४८२ रुपये होते. सन १९९२-९३ मध्ये जिल्ह्यात तालुकानिहाय सावकार सातारा ५, वाई २९, खंडाळा ३, फलटण १३, कराड ३५, महाबळेश्वर २, खटाव व कोरेगाव येथे प्रत्येकी एक सावकर होते. त्यांनी दिलेली एकूण कर्जे ४९३.९२ लाख रुपये होती. त्यापैकी व्यापारी कर्ज ७०.७९ लाख रुपये होते. तर १९९५-९६ मध्ये सातारा ९, वाई ३०, खंडाळा ३, फलटण १३, कराड ३४,महाबळेश्वर २, खटाव २ व कोरेगाव येथे प्रत्येकी एक सावकार होते. त्यांनी दिलेली एकूण कर्जे ७०१.४५ लाख रुपये होती. त्यापैकी व्यापारी कर्जे ६०.५७ लाख रुपये होती.

**कर्जमुक्तीसाठी शासकीय प्रयत्न :** सावकारी व्यवसायावर शासनाचे नियंत्रण येईपर्यन्त सावकार आणि शेतकरी यांच्यातील संबंधात तणाव होते. त्यातूनच अनेकदा दंगे उद्‌भवले. दख्खनच्या दंग्यांचा वर उल्लेख आलेलाच आहे. या दंग्यांच्या भयानक स्वरूपामुळे त्यांचे तत्कालीन आर्थिक व सामाजिक जीवनावर अनिष्ट परिणाम झाले. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष पसरून क्रांतीची चिन्हे दिसू लागली. त्यावर उपाययोजना म्हणून १८७९ मध्ये सरकारने "डेक्कन ॲग्रिकल्चरल डेटर्स रिलिफ ॲक्ट" संमत केला. शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा कमी व्हावा व त्यांच्या जमिनी व मालमत्ता यावर सावकरांकडून जप्ती आणली जाऊ नये, हे या अधिनियमाचे प्रमुख उद्दिष्ट होते. त्यानंतर कॉंग्रेसचे पहिले लोकनियुक्त मंत्रिमंडळ अस्तित्वात आल्यावर १९३९ मध्ये मुंबई सरकारने बॉम्बे ॲग्रिकल्चरल डेटर्स रिलिफ ॲक्ट संमत केला. शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने त्यात वेळोवेळी सुधारणा करण्यात आल्या.

सन १९७५ मधील महाराष्ट्र राज्य कर्जमुक्ती वटहुकुमाच्या अंमलबजावणीस सुरुवात झाल्यापासून १९७९ अखेर जिल्ह्यात १,४१४ व्यक्तींना कर्ज निवारणाचा फायदा मिळाला. त्यांची ३,०५,०६० रुपयांची कर्जे शासनाने माफ केली. बहुसंख्य अल्पभूधारकांकडे शासन, सहकारी संस्था किंवा बँका यांचेपैकी कोणाचे तरी कर्ज असे. त्यामुळे त्यांना नवीन कर्ज घेतांना अडचणी येऊ लागल्या व कृषी विकासाची गती मंद झाली. त्यावर उपाय म्हणून शासनाने १९८० मध्ये अल्पभूधारकांसाठी कर्ज माफीची योजना राबविली. त्याद्वारे शासनाने राज्यातील अल्पभूधारकांना सुमारे ४८ कोटी रुपयांची कर्जमाफी दिली. ही योजना शासनाच्या कृषी व सहकार विभागातर्फे राबविण्यात आली. त्यानुसार पाच एकरापर्यंत कोरडवाहू जमीन असलेले व ज्यांचे वार्षिक उत्पन्न २,४०० रुपयांपेक्षा जास्त नाही, अशा अल्पभूधारकांकडे ३० जून १९७९ पर्यंत असलेली थकित कर्जे माफ करण्याची योजना आखण्यात आली. या योजनेनुसार जिल्ह्यातील सहकार विभागामार्फत ७५५ सहकारी संस्थांच्या २०,५०३ अल्पभूधारक सभासदांना ३१०.७६ लाख रुपये आर्थिक सहाय्य मंजूर केले. या अनुदानातून १५,५५४ थकबाकीदारांना १६३.९० लाख रुपये कर्ज माफी मिळाली. [जिल्हा उप-निबंधक, सहकारी संस्था, सातारा यांचेकडून आलेली माहिती.]

अनुक्रमणिका

सन १९८० च्या कृषी कर्जमाफीनंतर १९८८ पर्यंत अनेक शेतकऱ्यांकडे प्राथमिक सहकारी संस्था व बँकांचे कर्ज थकल्यामुळे पुन्हा पूर्ववत स्थिती निर्माण झाली व शेतकऱ्यांना विकासासाठी आणखी कृषी कर्ज मिळणे दुरापास्त झाले, म्हणून शासनाने डिसेंबर १९८८ मध्ये थकबाकी पुनर्गठन योजना अंमलात आणली. त्यानुसार कृषी कर्ज माफ न करता शेतकरी भरू शकेल असे थकित कर्जाचे मुद्दल व व्याजाचे हप्ते पाडण्यात आले. यामुळे पहिला हप्ता भरल्यावर त्यास प्राथमिक सहकारी संस्था व सहकारी बँकाकडून शेती विकासासाठी पर्याप्त कर्ज मिळण्याची सुविधा प्राप्त झाली. जिल्ह्यात ७३३ सहकारी संस्थांच्या २०,९८८ अल्पभूधारक सभासदांना एकूण ६३१.८३ लाख रुपये शासनाने आर्थिक सहाय्य मंजूर केले.

## सहकारी चळवळ

जिल्ह्यात १९०७ मध्ये पहिली कृषी पतसंस्था बोधे (ता. माण) येथे स्थापन झाली. त्यानंतर शेतकऱ्यांच्या मूलभूत आर्थिक गरजा भागविण्यासाठी जिल्ह्यातील वेगवेगळ्या भागात कृषी पतसंस्था स्थापन झाल्या. इ. स. १९२१ मध्ये वाई तालुका को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीची स्थापन खंडेराव वाकडे, चुनीलाल गांधी व कोंडो गणेश दामले यांनी केली. या पतसंस्थेचे १९३१ मध्ये वाई अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक या नागरी सहकारी बँकेत रूपांतर झाले. [**भारतातील पहिली नागरी सहकारी पतपेढी (बँक) स्थापना करण्याचा मान वाई तालुक्यात जन्मलेले विठ्ठल लक्ष्मण कवठेकर व महादेव पांडुरंग नेने यांच्याकडे जातो. त्यांनी १८८९ मध्ये बडोदा येथे अन्योन्य सहाय्यकारी मंडळी नावाची सहकारी बँक स्थापना केली. सकाळ**, २२ सप्टेंबर १९९३.] संस्थानातील प्रजेच्या आर्थिक अडचणी सोडविण्यासाठी मालोजी राजे नाईक निंबाळकर यांनी १९२६ मध्ये फलटणला लक्ष्मी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेची स्थापना केली. सन १९४९ मध्ये साताऱ्याला मध्यवर्ती वित्त संस्थांचे प्रतिनिधीत्व करणारी नॉर्थ सातारा सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेची स्थापना झाली. या सहकारी संस्था खेड्यातील शेतकऱ्यांना शेतीसाठीच पत पुरवठा करीत होत्या. यामुळे जिल्ह्यातील सामाजिक व आर्थिक गरजा भागविण्यासाठी वेगवेगळ्या घटकांतून पतसंस्था निर्माण झाल्या.

सन १९४०-४१ मध्ये जिल्ह्यात ३२९ सहकारी संस्था होत्या. मुंबई प्रांतातील इतर भागाप्रमाणे या जिल्ह्यातही आर्थिक प्रश्न सहकारी तत्त्वावर सोडविण्यासाठी सहकारी चळवळीने निरनिराळ्या क्षेत्रात पदार्पण केले. पुढे सहकारी खरेदी-विक्री संस्था अस्तित्वात आल्या. प्रतिकूल परिस्थितीत सहकारी संस्थांची वाढ होऊन १९६० मध्ये त्यांची संख्या ५७६, सभासद संख्या ६५,७९० व खेळते भांडवल रुपये १,०२,३१,९०१ होते. सहकारी संस्थांच्या १९४०-४१, १९६०-६१, १९८०-८१ व १९९०-९१ ची संस्था व सभासदांची आकडेवारी खाली दिली आहे.

| वर्ष | संस्था | सभासद | वर्ष | संस्था | सभासद |
|---|---|---|---|---|---|
| १९४०-४१ | ३२९ | १६,८८१ | १९८०-८१ | २,१४५ | ४.६९ (लाख) |
| १९६०-६१ | ५७६ | ६५,७९० | १९९०-९१ | ३,९८६ | १०.२० (लाख) |

सन १९९२-९३ अखेर जिल्ह्यात सर्व प्रकारच्या ४,३५६ सहकारी संस्था होत्या व त्यांची सभासद संख्या १२.५९ लाख होती. सहकारी संस्थाची तालुकानिहाय माहिती तक्ता क्रमांक १ मध्ये दिली आहे. [**सर्व तक्ते प्रकरणाच्या शेवटी दिलेले आहेत.**] तर मार्च १९९५ अखेर जिल्ह्यात या संस्थाची एकूण संख्या ४,८४३ होती व त्यांची सभासद संख्या १४.४९ लाख होती.

अनुक्रमणिका

## सहकारी बँका

**सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक :** सन १९४९ मध्ये साताऱ्याला नॉर्थ सातारा डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक स्थापन झाली. फलटणच्या लक्ष्मी को-ऑपरेटिव्ह बँकेचे या बँकेत विलिनीकरण होऊन १५ ऑगस्ट १९६१ रोजी सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक स्थापन झाली. ही बँक जिल्ह्यातील सर्व प्राथमिक पतपेढ्यांच्या गरजा भागविण्यासाठी संयुक्त मध्यवर्ती वित्तसंस्था म्हणून काम करते.

सन १९९२-९३ मध्ये या बँकेच्या मुख्य कचेरीसह जिल्ह्यात १७५ शाखा होत्या. तसेच २,६८६ सोसायट्या व १,७५६ व्यक्तिगत सभासद होते. सन १९९२-९३ मध्ये दिलेली कर्जे २१,७०६.५२ लाख रुपये, गुंतवणूक ५,८६६.३४ लाख रुपये व खेळते भांडवल ३०,७१९.६७ लाख रुपये होते. बँकेच्या सांपत्तिक स्थितीची माहिती तक्ता क्रमांक २ मध्ये दिली आहे.

शेतकऱ्यांना बी-बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके, पाणी व वीज बिले इत्यादीसाठी प्राथमिक संस्थांमार्फत अल्प मुदतीची कर्जे दिली जातात. याशिवाय गाई, म्हशी, बैल, बैलगाड्या, विद्युत मोटार इत्यादी खरेदीसाठी व विहिरींच्या दुरुस्तीसाठी अल्प मुदतीची कर्जे दिली जातात. कृषी पंढरी योजनेनुसार वेगवेगळ्या योजनांतर्गत शेतकऱ्यांना कर्जपुरवठा केला जातो. त्याची माहिती तक्ता क्रमांक ३ मध्ये दिली आहे. सन १९९२-९३ मध्ये बँकेने ४८,४८.०५ लाख रुपये कर्ज वाटप केले. त्यापैकी सबळ सभासदांना १८,०४.०६ लाख व दुर्बल सभासदांना ३०,४३.९९ लाख रुपये कर्ज दिले. डिसेंबर १९९२ ची मुंबईमध्ये झालेली दंगल आणि १२ मार्च १९९३ च्या बॉम्बस्फोटामध्ये सातारा जिल्ह्यातील जे नागरिक मृत अथवा जखमी झाले त्यांच्या कुटुंबियांनी सामाजिक बांधिलकीच्या धोरणानुसार बँकेने मृतांचे वारसांना प्रत्येकी ५,००० रुपये व जखमींना प्रत्येकी २,००० रुपये याप्रमाणे ५६,००० रुपये मदत म्हणून दिले.

मार्च १९९७ अखेर बँकेने २०७ शाखा व चार विस्तारित कक्ष यांच्या माध्यमातून कृषी पत पुरवठ्याबरोबरच शेतकऱ्यांना बँकींग सेवाही उपलब्ध करून दिली होती. शेतकऱ्यांच्यासाठी "ग्रामीण घरकुल कर्ज योजना", "ठाणबंद" शेळी प्रकल्प कर्ज पुरवठा, "ग्रामीण शौचालय कर्जपुरवठा योजना" व ग्रामीण विकासाशी निगडित असलेल्या विविध कार्यकारी सहकारी सोसायट्यांना रेशनिंग दुकान व्यवसायासाठी कमी व्याजदराने पतपुरवठा केला. शासन पुरस्कृत पीक वीमा योजनाही बँकेने यशस्वीरित्या राबविली असून शेतकऱ्यांना नुकसान भरपाईच्या रकमा मिळवून दिल्या आहेत. ग्रामीण भागात लघु उद्योगधंद्याची वाढ होण्यासाठी स्वयंरोजगाराभिमुख दृष्टिकोन ठेवून बँकेतर्फे ग्रामीण कारागीर योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील कारागिरांना, सुशिक्षित बेकारांना व्यवसायासाठी प्रत्येकी रुपये ५०,००० पर्यंत कर्जपुरवठा केला जातो. मार्च १९९७ अखेर एकूण सभासद ४,७०१ होते. तर ठेव ४८,६५३.३८ लाख रुपये होती.

**महाराष्ट्र राज्य सहकारी कृषी व ग्रामीण विकास बँक (भूविकास बँक) :** सन १९७३ पूर्वी या बँकेला भूतारण बँक म्हणत. सन १९२५ च्या मुंबई प्रांत सहकार अधिनियमानुसार २८ जून १९३५ रोजी कराड येथे या बँकेची शाखा स्थापना झाली. या शाखेच्या कक्षेत सांगली भागही होता. त्यानंतर मार्च १९५० मध्ये सांगलीला स्वतंत्र शाखा उघडण्यात आली. बँकेच्या कामकाजाच्या सोयीसाठी १९५८-५९ मध्ये फलटण, सातारा, इस्लामपूर व तासगाव येथे शाखा उघडण्यात आल्या. बँकेचे मुख्य कार्यालय कराड येथेच होते. सांगली जिल्हा वेगळा झाल्यानंतर १९६४ मध्ये बँकेचे मध्यवर्ती कार्यालय साताऱ्यास हलविण्यात आले.

अनुक्रमणिका

बँकेचा मूळ उद्देश शेतकऱ्यांना कर्ज देणे, जुनी कर्जे फेडणे व शेती विकासासाठी कर्ज देणे हा होता. त्यानंतर जमिनीची बांधबंदिस्ती करणे, पडीक जमीन लागवडीखाली आणणे, विहीर खोदणे, जुनी विहीर दुरूस्त करणे. ऑईल इंजिन व विद्युत मोटारीसाठी दीर्घ मुदतीची कर्जे देण्यास सुरुवात झाली. शिवाय गोबरगॅस व मळणीयंत्र खरेदीसाठीही कर्ज दिले जाते. दिनांक १ मे १९७३ पासून भूविकास बँकांच्या कामकाजावर नियंत्रण ठेवून राज्यभर एकसूत्री अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने सर्व जिल्हा भूविकास बँकांचे शिखर बँकेत विलीनीकरण केले व महाराष्ट्र राज्य सहकारी भूविकास बँक नामक राज्यस्तरावरील शिखर बँकेची स्थापना केली. कर्जवाटप धोरणातही काही मूलभूत बदल करण्यात आले. सन १९८७-८८ मध्ये शिखर बँकेचे नाव बदलून महाराष्ट्र राज्य सहकारी कृषी व ग्रामीण विकास बँक असे ठेवण्यात आले. शेती व शेतीचे पुरक व्यवसाय ग्रामीण भागातील कलाकुसरीच्या कामाला प्राधान्य व शासकीय कामाचा एक भाग म्हणून बँकेने ग्रामीण कुटीरोद्योग या योजनेमध्ये १९८७-८८ मध्ये १०५ कुटीरोद्योगांना ११,९६,५८२ रुपये कर्ज वाटप केले. बँकेने केलेल्या कर्जवाटपासंबंधी माहिती तक्ता क्रमांक ४ मध्ये दिली आहे.

**नागरी सहकारी बँका :** सन १९१७ मध्ये स्थापन झालेली कराड अर्बन सहकारी बँक ही जिल्ह्यातील पहिली नागरी सहकारी बँक होय. त्या वर्षी तिची सभासद संख्या ५१ व भाग भांडवल ५१,००० रुपये होते. सन १९४८-४९ मध्ये जिल्ह्यातील ३९ नागरी सहकारी संस्थांचे १०,४४३ सभासद होते. [**सी. एन. वकील, को-ऑपरेटिव्ह मुव्हमेंट इन दि बॉम्बे स्टेट**, १९५३, पृ. १४८.] सन १९६१ मध्ये त्यांची संख्या ४६ होती. त्यापैकी पाच नागरी सहकारी बँका, १२ नागरी सहकारी पतपेढ्या, २५ वेतनदारांच्या सहकारी संस्था आणि चार औद्योगिक कामगारांच्या संस्था होत्या. त्यांची एकूण सभासद संख्या १८,६७५ व भाग भांडवल २०.६४ लाख, राखीव आणि इतर निधी ११.१३ लाख, ठेवी ७३.५६ लाख आणि वर्षभरात दिलेल्या कर्जाची रक्कम १,१३.९८ लाख रुपये होती. [**जिल्हा जनगणना निर्देशग्रंथ**, सातारा, १९६१, पृ. ३५.] या बँकांचा मुख्य उद्देश सभासदांना व्यापारासाठी भांडवल, मालमत्ता खरेदीसाठी, लग्नकार्य, शिक्षण इत्यादीसाठी कर्जपुरवठा करणे हा आहे. या बँका शेतीसाठी देखील कर्जपुरवठा करतात. त्यांची आकडेवारी खाली दिली आहे.

(रुपये हजारात)

| बाब | | १९८२-८३ | १९९२-९३ | १९९५-९६ |
|---|---|---|---|---|
| संख्या | .. | १५ | १६ | २२ |
| सभासद संख्या | .. | ७२,९९१ | १,४०,१४८ | १,८३,६६८ |
| वसूल भाग भांडवल | | २४,११८ | ९९,३९७ | १,४८,७४२ |
| राखीव निधी | .. | ९,६८० | ५८,६१४ | ८५,९८० |
| इतर निधी | .. | २०,७५० | १,२१,८९० | १,७८,१९३ |
| ठेवी | .. | २,९२,७४२ | १६,८४,०५२ | ३३,१३,५२० |
| येणे कर्ज | .. | २,४४,०५८ | १४,९०,७०२ | २७,५०,६५८ |
| थकबाकी | .. | २०,१२४ | १,३८,४५३ | १,६८,७७७ |
| नफा | .. | ७,६४४ | ३४,५२८ | ३७,५११ |

अनुक्रमणिका

**प्राथमिक कृषि पतसंस्था :**

या संस्थांचा मुख्य उद्देश सभासदांना बी-बियाणे, खते, कीटकनाशके, अवजारे, बैल व बैलगाड्यांसाठी कर्ज देणे असल्यामुळे त्यांना शेतकी सहकारी पतपेढ्या किंवा बहुउद्देशीय सेवा संस्था असेही म्हणतात. या संस्था बहुतांश ग्रामीण भागात असून शेतकरीच त्यांचे सभासद असतात. पहिली शेतकी पतसंस्था बोधे येथे १९०७ मध्ये स्थापन झाली. सन १९४८-४९ मधील ५३१ प्राथमिक शेती पतसंस्थांची सभासद संख्या ३५,६१८ होती. या वर्षी राज्यातील इतर जिल्ह्यांच्या तुलनेत साताऱ्यात सर्वात जास्त संस्था होत्या. [**किल्ला**, पृ. ४८.] सन १९६०-६१ मध्ये प्राथमिक शेतकी पतसंस्थांचे एकूण भाग भांडवल व राखीव निधी ६३.१ लाख व दिलेले कर्ज १,१८.७ लाख रुपये होते. सन १९८०-८१ मध्ये ७५२ संस्था होत्या. त्यापैकी सर्वात जास्त कराड तालुक्यात (१२४) होत्या. जिल्ह्यातील संस्थांची माहिती खाली दिली आहे.

(रुपये हजारात)

| बाब<br>(१) | | १९८२-८३<br>(२) | १९९२-९३<br>(३) | १९९५-९६<br>(४) |
|---|---|---|---|---|
| संख्या | .. | ७५६ | ८२१ | ८५८ |
| **सभासद** | | | | |
| (अ) भूधारक | .. | २,२८,८३५ | ३,५०,४०२ | ३,७५,३७३ |
| (ब) इतर | .. | २९,४९८ | ५०,६९२ | ५५,६०६ |
| **वसूल भाग भांडवल** | | | | |
| (अ) सभासदांचे | .. | ५२,८०८ | १,८३,३०५ | २,६५,४२९ |
| (ब) इतर | .. | ७१७ | .. | २,६३,६२० |
| राखीव निधी | .. | ७,६२५ | २४,४१० | ३९,६०३ |
| इतर निधी | .. | ६,६६० | २३,२२७ | ३२,५०३ |
| ठेवी | .. | ४५७ | २,४६३ | ३,६९१ |
| बाहेरील कर्जे | .. | १,४८,२०९ | ६,०९,७९१ | ७,६२,०२२ |
| येणे कर्ज | .. | १,६२,४९७ | ६,६९,७६४ | ८,८९,१८४ |
| थकबाकी | .. | ४८,८४७ | १,९५,७०० | १,८६,४२५ |

**शेतकरी बिगरपतसंस्था :**

या संस्थांमध्ये प्रामुख्याने खरेदी-विक्री संघ, शेती माल प्रक्रिया संस्था, दुग्धोत्पादक सस्था, सहकारी शेती संस्था, जलसिंचन संस्था व मत्स्यव्यवसाय संस्थांचा समावेश होतो.

**खरेदी-विक्री संघ :** २५ जानेवारी १९६२ रोजी जिल्ह्यात पहिला खरेदी-विक्री संघ स्थापन झाला. त्यानंतर प्रत्येक तालुक्यात खरेदी-विक्री संघ स्थापन झाले. संघामार्फत शेतकऱ्यांच्या मालाची विक्री व त्यास कर्जही मिळते. शेतकऱ्यांना बियाणे, खते, कीटकनाशके व इतर उपयुक्त वस्तूंचा पुरवठा केला जातो. संघाच्या कार्याचा तपशील याच प्रकरणातील "सहकारी विपणन" मध्ये दिला आहे.

**मच्छीमार संस्था :** सन १९६१ मध्ये कराड व म्हसवड येथे प्रत्येकी दोन संस्था होत्या. त्यांची सभासद संख्या ९२ व खेळते भांडवल २,७८६ रुपये होते. जिल्ह्यात ३० जून १९८७ रोजी २२ मच्छीमार संस्था व एक मध्यवर्ती मच्छीमार संघ होता. त्यांची एकूण सभासद संख्या १,०८६ होती. १९९२-९३ मध्ये जिल्ह्यात ३९ मच्छीमार संस्था होत्या.

**सहकारी शेती संस्था :** पहिली सहकारी शेती संस्था फेब्रुवारी १९४८ मध्ये किरकसाळ (ता. माण) येथे स्थापन झाली. त्यावर्षी तिची सभासद संख्या ११ व भाग भांडवल १,००० रुपये होते. त्यानंतर १९५२ मध्ये पळसावडे (ता. माण) येथे दुसरी संस्था स्थापन झाली. सन १९५५ मध्ये पाच अणि १९९२-९३ मध्ये नऊ संस्था होत्या. सन १९९२-९३ मधील नऊ संस्थांचे १,५७६ सभासद असून संस्थांकडे ५,५८८ हेक्टर जमीन होती.

**शेती माल प्रक्रिया संस्था :** जून १९६१ मध्ये फलटणला सहकारी कापूस वटण दाबणी कारखाना व कोरेगाव, नागठाणे अणि कराडला प्रत्येकी एक सहकारी तेल गिरणी होती. शिवाय जिल्ह्यात चार गूळ खांडसरी संस्था होत्या. शेती माल प्रक्रिया संस्थांची माहिती खाली दिली आहे.

(रुपये हजारात)

| बाब | | १९८२-८३ | १९९४-९५ |
|---|---|---|---|
| (१) | | (२) | (३) |
| संस्था | .. | १० | २७ |
| सभासद | .. | ८,२०७ | १०,८०३ |
| वसूल भाग भांडवल | .. | १,७५४ | ४,३४२ |
| निधी | .. | ३,९७८ | ७,४१६ |
| ठेवी | .. | २०४ | ७०५ |
| कर्जे | .. | १,२६६ | ४,५२५ |
| नफा | .. | .. | ३७७ |
| तोटा | .. | .. | १६८ |

**दुग्ध व्यवसाय संस्था :** जिल्ह्यात पहिला दूध संघ १९५७ साली कराडला स्थापन झाला. त्यानंतर १९६४ मध्ये साताऱ्याला दूध संघ स्थापन झाला. पहिली दुग्धशाळा १९६६ मध्ये महाबळेश्वरला स्थापन झाली. दुग्धोत्पादक संघ संस्थासंबंधी १९८२-८३ व १९९५-९६ ची माहिती खाली दिली आहे.

अनुक्रमणिका

(रुपये हजारात)

| बाब<br>(१) | | १९८२-८३<br>(२) | १९९५-९६<br>(३) |
|---|---|---|---|
| दूध संघ | . . | ७ | ८ |
| प्राथमिक दूध संस्था | . . | ६०४ | १,३३७ |
| सभासद | . . | ४६,३६५ | . . |
| वसूल भाग भांडवल | . . | ३,८८१ | ३,२२६ |
| राखीव व इतर निधी | . . | १४,६८५ | ७५,३६७ |
| खेळते भांडवल | . . | ५६,७११ | २,२६,४४१ |
| दूध खरेदी (लिटर) | . . | १,१२,९७२ | १३,७६,२६,२८६ |
| नफा | . . | . . | १४,९६२ |
| तोटा | . . | ३२२ | २,४६१ |

**सहकारी जलसिंचन संस्था :** जिल्ह्यात पहिली जलसिंचन संस्था तांबवे येथे १९५० साली स्थापन झाली. त्यावर्षी तिची सभासद संख्या ११ व भाग भांडवल १,१०० रुपये होते. सन १९९१-९२ मध्ये जिल्ह्यात ४९४ संस्था असून ३८,८५५ हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली होते या संस्थांची माहिती खाली दिली आहे.

(रुपये हजारात)

| बाब<br>(१) | | १९८२-८३<br>(२) | १९९५-९६<br>(३) |
|---|---|---|---|
| संस्था | . . | २६३ | ५१८ |
| सभासद | . . | २४,८६५ | ४०,७१३ |
| वसूल भाग भांडवल | . . | ८,०७९ | ७८,९८२ |
| राखीव निधी | . . | ५,२८६ | ५८,८२० |
| कायम जिंदगी | . . | ३५,४६५ | . . |
| जलप्रदायक्षेत्र (हेक्टर) | . . | ६४,७१० | ५६,१७६ |
| प्रत्यक्ष भिजलेले क्षेत्र (हेक्टर) | | ११,६८० | ९९,०५२ |
| नफा | . . | १,९२४ | ७,९९० |
| तोटा | . . | ८२४ | १५,१९० |

अनुक्रमणिका

**बिगरशेतकी पतसंस्था :**

**पगारदार व नागरी सहकारी पतसंस्था :** सन १९१० मध्ये एक विचार मंडळ अर्बन सहकारी पतसंस्था ही पहिली संस्था सातार्‍यास स्थापन झाली. त्यावर्षी तिची सभासद संख्या ५० व भाग भांडवल ५०० रुपये होते. या संस्थांची १९८२-८३ व १९९५-९६ ची माहिती खाली दिली आहे.

(रुपये हजारात)

| बाब<br>(१) | | १९८२-८३<br>(२) | १९९५-९६<br>(३) |
|---|---|---|---|
| संस्था | . . | १४० | ७२१ |
| सभासद | . . | ५२,०२० | ३,४१,७८१ |
| वसूल भाग भांडवल | . . | ३४,५८८ | ३,७०,९८६ |
| राखीव निधी | . . | ३,३०६ | ६५,३०९ |
| इतर निधी | . . | २१,१६५ | २७,३३५ |
| ठेवी | . . | १६,२०७ | ८,५०,४०९ |
| बाहेरील कर्जे | . . | ८,८४२ | ६८,७७४ |
| येणे कर्ज | . . | ६२,०५५ | ११,६२,१११ |
| थकबाकी | . . | २,१०७ | १,०४,९२७ |
| नफा | . . | ५,१२७ | ४९,१८४ |
| तोटा | . . | १०६ | . . |

**बिगरशेतकी बिगरपतसंस्था :**

**मजूर सहकारी संस्था :** हनुमान मजूर सहकारी संस्था ही पहिली संस्था वडूज (ता. खटाव) येथे १९६० मध्ये स्थापन झाली. त्यावर्षी तिची सभासद संख्या ११ व भाग भांडवल १,१०० रुपये होते. जिल्हा पातळीवर सर्व मजूर सहकारी संस्थांचा सहकारी संघही कार्यरत आहे. मजूर संस्थांची माहिती खाली दिली आहे.

(रुपये हजारात)

| बाब<br>(१) | | १९८२-८३<br>(२) | १९९५-९६<br>(३) |
|---|---|---|---|
| संस्था | . . | १६५ | २६७ |
| सभासद | . . | ८,९४८ | १३,५५९ |
| वसूल भाग भांडवल | . . | ६४४ | २,२०५ |

अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| निधी | . . | ४१६ | १,८७२ |
| कर्जे | . . | १२२ | ४१४ |
| केलेले काम | . . | २४,१४९ | १,४३,०१० |
| मजुरी | . . | १८,९७३ | २०,०५८ |
| नफा | . . | ३२१ | १,२४८ |
| तोटा | . . | ११२ | २,०८१ |

**विणकर सहकारी संस्था :** अतित (तालुका सातारा) येथे १९४५ मध्ये यंत्रमाग सहकारी संस्था व १९६२ मध्ये मायणीला स्थापन झालेली हातमाग सहकारी संस्था या जिल्ह्यातील पहिल्या संस्था होत. या संस्थांची १९८२-८३ व १९९५-९६ ची माहिती खाली दिली आहे.

(रुपये हजारात)

| बाब | | हातमाग | | यंत्रमाग | |
|---|---|---|---|---|---|
| | | १९८२-८३ | १९९५-९६ | १९८२-८३ | १९९५-९६ |
| (१) | | (२) | (३) | (४) | (५) |
| संस्था | . . | ५ | ३ | १० | ८ |
| सभासद | . . | ७३२ | ५१८ | ३८५ | ३३५ |
| वसूल भाग भांडवल | . . | ७५ | १२५ | १,६४६ | १,२१५ |
| निधी | . . | ६ | ३३४ | ४ | ६४ |
| कर्जे | . . | २१ | २६ | १५,१८२ | ५३२ |
| माग | . . | ८७ | ४० | ४०८ | ३८४ |
| उत्पादित मालाची किंमत | | २० | ६१९ | ४०१ | . . |
| विक्री | . . | ५२० | ६१९ | ३९३ | . . |
| मजुरी | . . | १३८ | . . | १९५ | ५५० |
| नफा | . . | ६ | ५ | ३ | . . |
| तोटा | . . | १ | . . | ९३६ | ३,६१७ |

**सहकारी गृहनिर्माण संस्था :** पाचगणी हिंदू सहकारी गृहनिर्माण संस्था ही या प्रकारची पहिली संस्था पाचगणी येथे १९४६ मध्ये स्थापन झाली. त्यावर्षी तिची सभासद संख्या ११ व भाग भांडवल १,१०० रुपये होते. १९८२-८३ व १९९५-९६ मधील संस्थाची माहिती खाली दिली आहे.

अनुक्रमणिका

(रुपये हजारात)

| बाब | | १९८२-८३ | १९९५-९६ |
|---|---|---|---|
| (१) | | (२) | (३) |
| संस्था | .. | २९६ | ६०४ |
| सभासद | .. | १५,५०३ | १८,७६५ |
| वसूल भाग भांडवल | .. | १,९१९ | ८,४१२ |
| राखीव निधी | .. | १,१६२ | १५,५०२ |
| बांधलेली घरे | .. | १,६४० | ४०५ |
| कर्जे | .. | ९,३०७ | ५६,१४८ |

**सहकारी औद्योगिक वसाहती :** जिल्ह्यात खालील सहकारी औद्योगिक वसाहती असून त्यांचे स्थापना वर्ष कंसात दिलेले आहे.

(१) यशवंत सहकारी औद्योगिक वसाहत, सातारा रोड (१९६१).
(२) कराड, सहकारी औद्योगिक वसाहत, ओगलेवाडी (१९६१).
(३) कोयना औद्योगिक वसाहत, कराड (१९७६).
(४) सहकारी औद्योगिक वसाहत, लोणंद(१९८७).
(५) सहकारी औद्योगिक वसाहत, फलटण (१९८८).

**कुंभारकाम सहकारी संस्था :** सन १९५७ -५८ मध्ये करंजे व आरळे येथे कुंभारकाम सहकारी संस्था होत्या. सन १९९०-९१ मध्ये असलेल्या सहा संस्थांचे एकूण ४३५ सभासद असून त्यांच्या उत्पादित मालाची किंमत २,१७,००० आणि विक्री किंमत २,९१,००० रुपये होती.

**जंगल कामगार सहकारी संस्था :** सन १९६१ मध्ये जिल्ह्यात सात जंगल कामगार संस्था आणि २१ कामगार करार संस्था होत्या. त्यांची सभासद संख्या अनुक्रमे ८४९ आणि १,२१५ होती. त्यावर्षी या संस्थांनी ५४,९०५ रुपये किंमतीचे जंगलमालाचे व ४.६७ लाख रुपये किमतीची कंत्राट कामे केली. १९९२-९३ मध्ये चार जंगल कामगार सहकारी संस्था होत्या. त्यांचे सभासद १,६९४ व भाग भांडवल ९४ हजार रुपये होते.

**सहकारी वाहतूक संस्था :** वाई तालुका सहकारी मोटार ट्रान्सपोर्ट संस्था ही जिल्ह्यातील पहिली वाहतूक संस्था १९८१ मध्ये स्थापन झाली. त्यावर्षी तिची सभासद संख्या २६ व भाग भाडवल ४,००० रुपये होते. सन १९९२-९३ मधील १० वाहतूक संस्थांचे ४३६ सभासद असून त्यांना १८,७२,००० रुपयांचे उत्पन्न मिळाले होते. सन १९९४-९५ मध्ये अशा संस्थांची संख्या आठ व त्यांची सभासद संख्या ४७३ होती.

**इतर औद्योगिक सहकारी संस्था :** अर्बन को-ऑपरेटिव्ह वर्कशाप, कराड ही जिल्ह्यातील पहिली संस्था १९४७ मध्ये स्थापन झाली. सन १९९२-९३ मध्ये जिल्ह्यात या प्रकारच्या १४९ संस्था होत्या. त्यांचे

अनुक्रमणिका

सभासद ३७,९४९, वसूल भाग भांडवल १०२.२३ लाख रुपये, राखीव निधी २,७०.५४ लाख रुपये व उत्पादन २,९९.६५ लाख रुपये होते. १९९४-९५ मध्ये अशा संस्थांची संख्या १७६ व ४३,००७ सभासद होते.

## उद्योगांना आर्थिक सहाय्य

उद्योगांचे विकेंद्रीकरण व ग्रामीण भागात औद्योगीकरणाचा वेग वाढविण्यासाठी शासनातर्फे विविध योजना राबविण्यात येतात. नवीन उद्योग सुरू करणे, जुन्या उद्योगांचा विकास करणे, लघु उद्योजकांना भांडवल मिळवून देण्यासाठी वित्तीय महामंडळे तसेच औद्योगिक आधारभूत गरजा उपलब्ध करून देणारी महामंडळे स्थापन झालेली आहेत. त्यांच्या कार्याचा आढावा खाली दिला आहे.

**महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ :** या महामंडळाची शाखा सातारा येथे १९७०-७१ पासून कार्यरत आहे. हे महामंडळ उत्पादक काम करणाऱ्या सार्वजनिक उद्योग समुहास व सहकारी औद्योगिक संस्थेस २० लाख रुपयापर्यंत व खाजगी उद्योजकांना १० लाख रुपयापर्यंत कर्ज देते. महामंडळाने दिलेल्या कर्जाची माहिती खाली दिली आहे.

| वर्ष | संख्या | वितरित रक्कम (रुपये हजारात) |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १९७०-७१ | १८ | ७.७२ |
| १९७५-७६ | ३२ | ८.३२ |
| १९८०-८१ | ५६ | ४९.८४ |
| १९८५-८६ | ६४ | १,५३.८८ |
| १९९०-९१ | ६१ | २,२४.२३ |
| १९९२-९३ | ८५ | ६,३४.८६ |

**महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ :** लघु उद्योगांच्या विकासासाठी महामंडळाची १९६२ मध्ये स्थापना झाल्यावर १ ऑगस्ट १९६५ मध्ये प्रत्यक्ष कार्यास सुरुवात झाली. या महामंडळाची साताऱ्यास १९८२ मध्ये शाखा स्थापन झाली. जिल्ह्यातील लघु उद्योग घटकांनी महामंडळास १९८५-८६ व १९८८-८९ मध्ये अनुक्रमे ७२.१७ लाख व १,०४.२९ लाख रुपयांची उत्पादने पुरविली. महामंडळाने १९८९-९० मध्ये १२६ घटकांना १,०४.५३ लाख रुपयांचे विक्री सहाय्य केले. महामंडळाकडून लघु उद्योगांना कच्चे लोखंड व कोळसा यांचे वितरण केले जाते. त्यानुसार १९९२-९३ मध्ये उद्योग घटकांना ९५० मे. टन कच्च्या लोखंडाचा पुरवठा केला होता.

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ :** उद्योजकांना विकसित भूखंड देणे हे प्रमुख कार्य आहे. साताऱ्याला औद्योगिक वसाहतीची स्थापना एप्रिल १९७१ मध्ये झाली. या वसाहतीसाठी महामंडळाने १५२.४६ हेक्टर जमीन संपादन केली होती. परंतु उद्योजकांची वाढती मागणी लक्षात घेऊन १९८१ मध्ये सातारा-देगांव रस्त्यालगत १८९.७६ हेक्टर जमीन संपादित करून अतिरिक्त औद्योगिक वसाहतीची

स्थापना केली. या औद्योगिक क्षेत्राची झपाट्याने वाढ होत असून त्या लगतच्या प्रकल्पग्रस्त गावांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सवलतीच्या दराने केला जातो. मार्च १९८८ अखेर महामंडळाने ३९४ भूखंड वाटून ७१ शेड बांधून दिल्या.

**पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ (स्थापना १९७३) :** सुशिक्षित बेरोजगारांना उद्योग सुरू करण्यासाठी बीज भांडवल उपलब्ध करून दिले जाते. तसेच विक्रीकर सूट योजनेनुसार आर्थिक सहाय्य, सर्वंकष प्रोत्साहन योजनेनुसार अर्थसहाय्य आणि खास भांडवल प्रोत्साहन योजनेनुसार अर्थसहाय्य दिले जाते. सन १९९५-९६ मध्ये महामंडळाने ६३ लाभार्थींना १८९.६६ लाख रुपये अनुदान दिले. महामंडळाने वाटप केलेल्या बीज भांडवलाची माहिती खाली दिली आहे.

| वर्ष<br>(१) | लाभार्थी<br>(२) | बीज भांडवल (लाख रुपये)<br>(३) |
|---|---|---|
| १९७२-७३ | १ | ०.०८ |
| १९८०-८१ | ३९७ | २७.२९ |
| १९९०-९१ | १५४ | २७.४७ |
| १९९२-९३ | १४५ | ११३.९२ |

बीज भांडवलाशिवाय महामंडळाने १९८०-८१ पासून औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील प्रशिक्षणार्थींना विद्यावेतन योजना अमलात आणली. सर्वंकष प्रोत्साहन योजनेनुसार उद्योग घटकांना अर्थसहाय्य व अनुदान दिले जाते.

**महाराष्ट्र राज्य औद्योगिक व गुंतवणूक महामंडळ (सिकॉम) :** औद्योगीकरण व औद्योगिक क्षेत्रे निर्माण करण्यासाठी विकास पतपेढी म्हणून सिकॉमची स्थापना ३१ मार्च १९६६ रोजी करण्यात आली. महामंडळाने ३१ मार्च १९८९ पर्यंत विविध योजनांखाली जिल्ह्यातील १५३ उद्योग घटकांना २३,२८.१६ लाख रुपये आर्थिक सहाय्य मंजूर करून १२,९८.१० लाख रुपयांचे वितरण केले होते.

**जिल्हा उद्योग केंद्र :** दोन लाख रुपयांपर्यंत भांडवल असलेल्या लघु उद्योग घटकांना व्यापारी बँका ७५ टक्के भांडवल देतात. उर्वरित २५ टक्के भांडवल उभारणीपैकी १० टक्के भांडवल जिल्हा उद्योग केंद्र देते. त्याचा तपशील खाली दिला आहे.

| वर्ष | कारखान्यांची संख्या | १० टक्के उपलब्ध केलेले भांडवल (रुपये) |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १९९०-९१ | १५ | ५,०७,४४५ |
| १९९२-९३ | १२ | ७,६३,३२५ |
| १९९३-९४ | ६ | ३,०८,९५१ |

अनुक्रमणिका

## कृषि अर्थसहाय्य

महाराष्ट्र शासनाने २२ सप्टेंबर १९७३ पासून तगाई कर्ज वाटप बंद केले असून आता शेतकऱ्यांना दीर्घ, मध्यम व अल्प मुदतीचे कर्ज सहकारी संस्था, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, महाराष्ट्र राज्य सहकारी कृषि व ग्रामीण विकास बँक व राष्ट्रीयीकृत बँकामार्फत दिले जाते.

**महाराष्ट्र राज्य सहकारी कृषि व गामीण विकास बँक :** ही बँक शेतकऱ्यांना मध्यम व दीर्घ मुदतीचे अर्थसहाय्य देते. बँकेने दिलेल्या कर्जाची माहिती खाली दिली आहे.

| वर्ष | कर्जपुरवठा (लाख रुपये) | वर्ष | कर्जपुरवठा (लाख रुपये) |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १९८३-८४ | १,५८,९१ | १९८९-९० | ६,९०.७४ |
| १९८७-८८ | ४,४६,१२ | १९९२-९३ | ६,४२.५८ |

**राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक (नाबार्ड) :** या बँकेची स्थापना नॅशनल बँक फॉर ॲग्रिकल्चर अँड रुरल डेव्हलपमेंट ॲक्ट, १९८१ अन्वये जुलै १९८२ मध्ये रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचा कृषि पतपुरवठा विभाग, ग्रामीण नियोजन व पत विभाग आणि कृषि पुनर्वित्त महामंडळ यांचे विलीनीकरण करून झाली. ही बँक ग्रामीण पत पुरवठ्याच्या संघटित संरचनेत शिखर संस्था म्हणून कार्य करते. बँकेने ग्रामीण भागातील उत्पादक कार्यक्रमासाठी वित्त पुरवठ्याची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. या जिल्ह्यात बायोगॅस, कुक्कूटपालन, मत्स्यव्यवसाय, दूध डेअरी, ग्राम विकास, लघु सिंचन, ग्रामीण विद्युतीकरण, रोप वाटिका व फळबाग, रेशीम उत्पादक, एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम इत्यादींसाठी सन १९९४-९५, १९९६-९७ व १९९७-९८ मध्ये अनुक्रमे १५,४८,८६, २१,४१.२८, १५,०४.२० लाख रुपये वितरीत केले.

## वाणिज्य बँका

अण्णासाहेब चिरमुले यांनी २० ऑगस्ट १९०७ रोजी सातरा स्वदेशी कमर्शियल बँकेची स्थापना केल्यापासून वाणिज्य बँकांच्या जिल्ह्यातील व्यवहाराचा प्रारंभ झाला. फलटणला मालोजीराजे नाईक निंबाळकर यांनी १९१८ मध्ये फलटन बँक स्थापन केली. साताऱ्यास १९३६ मध्ये युनायटेड वेस्टर्न बँक ऑफ इंडियाची स्थापना झाली. सन १९३८ मध्ये औंधला बँक ऑफ औंध, १९४६ मध्ये कराडला बँक ऑफ कराडची स्थापना झाली. सन १९५१ मध्ये साताऱ्यास बँक ऑफ कराडची शाखा तसेच १९५४ मध्ये लोणंदला युनायटेड वेस्टर्न बँक ऑफ इंडियाची शाखा निघाली. १९५६ मध्ये साताऱ्यास स्टेट बँक ऑफ इंडियाची शाखा आली. कोल्हापूरची युनियन बँक याच वर्षी युनायटेड वेस्टर्न बँकेत विलीन झाली. सन १९५८ मध्ये फलटण या बँकेने शाखा काढली. यावर्षी जिल्ह्यात १४ संयुक्त भांडवली बँका होत्या त्यापैकी आठ बँकांची मुख्य कार्यालये जिल्ह्याबाहेर होती. सन १९६१ मध्ये अनुसूचित व बिगर अनुसूचित व्यापारी बँकांच्या अनुक्रमे १० व १२ शाखा होत्या. साताऱ्याची स्वदेशी कमर्शियल बँक १९६२ मध्ये युनायटेड वेस्टर्न बँकेत विलीन झाली. जुलै १९६९ मध्ये झालेल्या बँकांच्या राष्ट्रीयीकरणानंतर या व्यवसायाच्या विकेंद्रीकरणास वेग येऊन लहान शहरे व मोठ्या गावांना वाणिज्य बँकांच्या बऱ्याच शाखा स्थापन झाल्या. सन १९९२ मध्ये अशा बँकांच्या १५० शाखा होत्या. त्यावेळी त्यांच्या ठेवी व त्यांनी दिलेली कर्जे अनुक्रमे

३२८.३० लाख रुपये व २०४.१५ लाख रूपये होती. [**बँकिंग स्टॅटिस्टिक्स, बेसिक स्टॅटिस्टिकल रिटर्न्स, व्हॉल्यूम २०, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया,** मार्च १९९१, पृ. ९५.]

बँकांचा कृषी, उद्योग, व्यापार व इतर क्षेत्रातील उलाढालींचा मार्च १९९१ मधील तपशील. [**बँकिंग स्टॅटिस्टिक्स, बेसिक स्टॅटिस्टिकल रिटर्न्स, व्हॉल्यूम २०, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया,** मार्च १९९१, पृ. ३४१.]

(हजार रुपये)

| क्षेत्र (१) | | | खाते संख्या (२) | अदत्त रक्कम (३) |
|---|---|---|---|---|
| कृषी : | . . | . . | ७३,८८८ | ७१,७४,२४ |
| प्रत्यक्ष | . . | . . | ७३,५२१ | ६४,४४.०२ |
| अप्रत्यक्ष | . . | . . | ३६७ | ७,३०,२२ |
| उद्योग : | . . | . . | ५,१६९ | ५७,१३,८७ |
| खाणकाम व दगडखाण | . . | . . | १५ | १५,८५ |
| खाद्य उद्योग | . . | . . | ११८ | १०,१८,१० |
| पेय व तंबाखू | . . | . . | २३ | ५,०५,६६ |
| कापड | . . | . . | ४८ | १,३८,५० |
| कागद व कागदाच्या वस्तू | . . | . . | ८७ | ७,६९,५६ |
| चर्मोद्योग | . . | . . | १६ | ७,४५ |
| रबरी वस्तू | . . | . . | २१ | ७५,९५ |
| रासायनिक | . . | . . | १११ | २,४१,३४ |
| पेट्रोलियम | . . | . . | २ | ७,४२ |
| सिमेंट व सिमेंटच्या वस्तू | . . | . . | ३१ | ५७,७४ |
| धातू | . . | . . | १९१ | ८,०६,६० |
| अभियांत्रिकी | . . | . . | २१० | ७,३८,१३ |
| परिवहन सामग्री व सुटे भाग | . . | . . | ८५ | २,९८,२४ |
| इतर | . . | . . | ४,१३३ | ६,५५,५७ |
| वीज, गॅस , जलपुरवठा | . . | . . | १६ | २,९४,३५ |
| बांधकाम | . . | . . | ६२ | ८३,४१ |
| वाहतूक प्रक्रिया | . . | . . | १६,९४ | १०,२९,२० |
| खाजगी कर्जे व व्यावसायिक सेवा | . . | . . | २०,७९८ | ३०,०१,५९ |
| व्यापार | . . | . . | १५,५०३ | १५,८१,३८ |
| इतर | . . | . . | २०,१९५ | १३,२२,१३ |
| एकूण पतपुरवठा | . . | . . | १,४२,५४७ | १,९८,२२,४१ |

अनुक्रमणिका

| | | | | |
|---|---|---|---|---|
| कुटीरोद्योग व लघुउद्योग | .. | .. | ४,३७७ | २४,४९,७५ |

## संयुक्त भांडवली कंपन्या

मार्च १९९३ मध्ये एकूण २३९ संयुक्त भांडवली कंपन्या होत्या. त्यापैकी २१८ खाजगी व २१ सार्वजनिक होत्या. तर मार्च १९९५ अखेर अशा संस्थांची संख्या फक्त पाच होती.

## बँक पत योजना

पूर्वी वाणिज्य बँका कृषी विकासासाठी अर्थसहाय्य देत नसत. या प्रयोजनासाठीही या बँकाचा उपयोग व्हावा यासाठी स्टेट बँक ऑफ इंडियाने बँकाकडील ठेवीच्या स्वरुपातील पैशाचा विनियोग कृषी विकासासाठी करण्याचे ठरविले. जिल्ह्याची बँक पत योजना करून त्यानुसार करावयाचे काम बँक ऑफ महाराष्ट्रकडे १९७४ मध्ये सोपविण्यात आले. या बँकेने १९९३-९४ मध्ये योजना तयार केल्यावर त्यामध्ये बँक ऑफ महाराष्ट्र, स्टेट बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ इंडिया, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ बरोडा, सिंडीकेट बँक, कॅनरा बँक, युनियन बँक ऑफ इंडिया, इंडियन बँक, देना बँक, विजया बँक, दि युनायटेड वेस्टर्न बँक, सांगली बँक, बँक ऑफ कराड, कर्नाटक बँक, सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, महाराष्ट्र राज्य सहकारी कृषी व ग्रामीण विकास बँक, महाराष्ट्र राज्य वित्तय महामंडळ व सिकॉम या संस्था देखील सहभागी झाल्या होत्या. सन १९९३-९४ मध्ये बँकांनी व महामंडळांनी केलेल्या कार्याची माहिती खालीलप्रमाणे होती.

| बाब | कार्यसिद्धी (हजार रुपये) |
|---|---|
| कृषी | ७४,८७,०० |
| लघुउद्योग | ९,६९,०० |
| इतर | २२,३६,०० |

वार्षिक ऋण योजनेअंतर्गत १९९३-९४ मधील वार्षिक योजनेचा तपशील खाली दिला आहे.

| बाब | | | | लाभार्थी | कर्जे (हजार रुपये) |
|---|---|---|---|---|---|
| पीक कर्ज | .. | .. | .. | ३३,४१५ | ६१,३९,०२ |
| मुदत कर्ज | .. | .. | .. | ३,४१५ | १,७४,३९ |
| कृषी कर्ज | .. | .. | .. | ८,८२३ | २६,१६,३६ |
| लघुउद्योग व कुटीरोद्योग | .. | .. | .. | २,२९५ | १३,०३,३१ |
| व्यापार व सेवा | .. | .. | .. | ५,१७३ | ९,१९,३१ |

## आयुर्विमा

अनुक्रमणिका

सन १९१३ मध्ये साताऱ्यास बा. ग. चिरमुले उर्फ नानासाहेब यांनी वेस्टर्न इंडिया लाईफ इंश्युरन्स कंपनी स्थापन केली. कंपनीचा विमा निधी १९४९ मध्ये ३,२५,३६,८३६ रुपये होता. कंपनीचे एकंदर खर्चाचे प्रमाण अत्यल्प उत्पन्नाच्या म्हणजे केवळ २३.०९ टक्के होते. कंपनीची एक शाखा होती. [**एस.एम. कणगली, पुण्याचा माहितगार**, १९४९ पृ. १०.]

लाईफ इंश्युरन्स (इमर्जन्सी प्रोव्हीजन्स) ऑर्डीनन्स, १९५६ अनुसार आयुर्विम्याचे राष्ट्रीयीकरण झाल्यापासून आयुर्विमा महामंडळ ही एकमेव संघटना हा व्यवसाय करीत आहे. लाईफ इंश्युरन्स कॉर्पोरेशन ॲक्ट, १९५६ अनुसार भारत सरकारने १ सप्टेंबर, १९५६ रोजी आयुर्विमा महामंडळाची स्थापना केली. सन १९५६ मध्ये साताऱ्यास विभागीय कार्यालय होते. [**विभागीय कार्यालयांतर्गत १९६० ते १९८१ पर्यंत सातारा जिल्ह्यासहित सांगली, सोलापूर, लातूर, उस्मानाबाद, कोल्हापूर, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांचा समावेश होता.**] जिल्ह्यात महामंडळाच्या तीन शाखा असून सातारा, जावळी, वाई, महाबळेश्वर, व कोरेगाव तालुक्यांचा समावेश सातारा शाखेत, कराड व पाटण तालुक्यांचा समावेश कराड शाखेत आणि फलटण व माण तालुक्यांचा समावेश फलटण शाखेच्या कार्यक्षेत्रात करण्यात आला आहे. महामंडळाने केलेल्या कार्याची तीन वर्षाची माहिती खाली दिली आहे.

| बाब | | | १९८५-८६ | १९९०-९१ | १९९६-९७ |
|---|---|---|---|---|---|
| प्रस्तावित विमापत्रे | .. | .. | उ. ना. | २३,६६२ | ३५,७८१ |
| प्रस्तावित विमापत्रांची रक्कम (लाख रुपये) | .. | .. | उ. ना. | ७,०५१ | १,७०,५४.८४ |
| दिलेली विमापत्रे | .. | .. | ८,१८५ | २३,२१५ | ३५,०५४ |
| एकूण रक्कम (लाख रुपये) | | .. | १,५७१ | ६,९३६ | १६५.०१ |
| प्रतिविमा रक्कम (रुपये) | .. | | १९,१९३ | २९,८७७ | ४७०.७३ |
| विमा एजन्ट | .. | .. | ४९८ | १,१३८ | १,५३१ |

## राष्ट्रीय बचत योजना

जिल्ह्यात बचत योजना १९५८ पासून गतिमान झाली. त्यावर्षी ९४ पोस्ट कार्यालयात अल्पबचतीची सोय होती. सन १९७०-७१ पासून महिलाप्रधान एजन्सीद्वारा पोस्टाच्या पाच वर्षीय आवर्ती ठेवी खात्यात लक्षणीय वाढ झाली. सन १९८७-८८ मध्ये १४.३८ कोटी रुपये नक्त गुंतवणुकीचे लक्ष्य असतांना प्रत्यक्षात १६.०१ कोटी नक्त गुंतवणूक मिळविली. त्याबद्दल शासनाने जिल्ह्याचा स्मृतिचिन्ह देऊन गौरव केला. अल्पबचत लक्ष्य व गुंतवणूकीची माहिती खाली दिली आहे.

| वर्ष | लक्ष्य | गुंतवणूक (कोटी रुपये) | |
|---|---|---|---|
| | | ढोबळ वसुली | निव्वळ वसुली |
| १९८३-८४ | २.५० | १३.७७ | ५.५२ |
| १९९२-९३ | २०.०० | ४०.५५ | २०.०६ |

जिल्ह्यात १९८५-८६ मध्ये ६१५ अधिकृत एजंट व ८४९ महिला प्रतिनिधी असून त्यांची संख्या १९९२-९३ मध्ये अनुक्रमे १,२९० आणि २,२०४ पर्यंत वाढली. अल्पबचत योजनेची आकडेवारी तक्ता क्रमांक ५ मध्ये दिलेली आहे. सन १९९६-९७ यावर्षी एकूण २८२५.०० लाख गुंतवणुकीचे उद्दिष्ट होते. ते ३००१.९४ लाख रुपये एवढी गुंतवणूक मिळवून एकूण उद्दिष्टाच्या १०६.२६ टक्के पूर्ण करण्यात आले.

## व्यापार

इ. स. १८८५, च्या **सातारा गॅझेटिअर** नुसार वाई, मालकम पेठ, सातारा, रहिमतपूर, पाटण, कराड, चरेगाव, उंब्रज, इस्लामपूर, म्हसवड, पुसेसावळी, विटा व तासगावला व्यापारी पेठा होत्या. या बाजारपेठांमधून स्थानिक मालाच्या विक्रीबरोबरच परप्रातांतून आयात मालाची विक्रीही होत असे. या पेठांमधून भुईमूग, शेंगा, हळद, मिरची, गूळ, तांदूळ, तंबाखू, धणे, घोंगडी इत्यादी माल प्रामुख्याने मुंबई, पुणे व कोकणात पाठविला जात असे. जिल्ह्यातील प्राचीन व मध्ययुगीन व्यापारी मार्गांची सखोल माहिती याच ग्रंथातील प्रकरण-७ 'वाहतूक व दळणवळण' मध्ये दिलेली आहे. मुंबई व पुण्याहून विदेशी कापड, नागपूर व सोलापूरहून कापड, चिपळूण, महाड व रत्नागिरीहून नारळ, खजूर, खारीक, सुपारी, मीठ व मसाल्याचे पदार्थ यांची आयात होत असे. तसेच येथे तयार होणारे महिलांचे झगे, चोळखण, हातमागावरील कापड आणि आयात केलेली लुगडी यांची विक्री स्थानिक बाजारात तसेच जिल्ह्याबाहेरही होत असे. व्यापाऱ्यांमध्ये प्रामुख्याने मारवाडी आणि गुजराती, वाणी, जैन, कोष्टी, कासार, तेली, तांबोळी, लिंगायत वाणी, मराठा कुणबी व मुसलमानांचा समावेश होता. सन १८८४ मध्ये साताऱ्याला ५००, रहिमतपूरला १५५, पाटणला २०, कराडला ४००, उंब्रजला २५, म्हसवडला ६०, पुसेसावळीला १२०, इस्लामपूरला ३०, विट्याला १५० व तासगावला १५० व्यापारी होते.

पूर्वीच्या काळी काकवी, धान्य, भुईमूग शेंग, हळद, मिरची, कापूस, लाकूड व कापडाची निर्यात होत असे. ज्वारी, गहू, मिरची, हळद व तंबाखू सातारा, कराड व वाळवा येथून चिपळूण मार्गे मुंबईस पाठविण्यात येई. सरकी न काढलेला कापूस वाळवा व तासगावहून चिपळूणला पाठविला जाई. जिल्ह्यातून प्रामुख्याने मांजरपाट, पासोडी व घोंगडी विक्रीसाठी इतर जिल्ह्यात पाठवित. सन १९२३-२४ मध्ये कराड, वाळवा व तासगाव तालुक्यातून आले व हळद, खंडाळा महालातून कांदा, जावळीहून धणे, माण व जावळी तालुक्यांतून सुमारे १५,००० रुपये किंमतीची अंडी निर्यात केली होती. [**रिपोर्ट ऑन दि ॲडमिनिस्ट्रेशन ऑफ द बाम्बे प्रेसिडन्सी**, १९२३-२४ पृ. ८३.] जिल्ह्याच्या दक्षिणेकडील तालुक्यांत उत्पादन होणारी भुईमूग शेंग मोठ्या प्रमाणात परदेशी निर्यात केली जात होती. सन १९२८-२९ मध्ये पाटण तालुक्यांतून अडीच लाख रुपये किंमतीची भुईमूग शेंग निर्यात झाली होती. [**कित्ता**, १९२८-२९, पृ. १०७.]

## विनियमित बाजारपेठा

कृषी उत्पादनास योग्य मूल्य मिळण्यासाठी मुंबई राज्य शासनाने १९२७ मध्ये मुंबई कापूस बाजार अधिनियम संमत केला. या अधिनियमामध्ये बऱ्याच उणीवा राहिल्याने व त्यामध्ये बऱ्याच कृषी मालाचे विनियमन झालेले नसल्याने मुंबई शासनाने १९३९ मध्ये मुंबई कृषी उत्पादन बाजार (विनियमन) अधिनियम संमत केला. या अधिनियमाची अंमलबजावणी १९४१ पासून करण्यात आली. या अधिनियमात शेतीमालाचे बाजारभाव ठरविण्याबाबत काही उणीवा राहून गेल्यामुळे महाराष्ट्र शासनाने १९६३ मध्ये महाराष्ट्र कृषी उत्पादन बाजार (विनियमन) अधिनियम संमत करुन त्याची अंमलबजावणी १९६७ पासून

सुरु केली. जिल्ह्यात पहिली विनियमित बाजारपेठ १९४४ मध्ये कराडला व दुसरी १९४९ मध्ये कोरेगावला स्थापन झाली. सन १९९२-९३ मध्ये नऊ कृषी उत्पादन बाजार समित्या व १८ उपबाजार होते. या बाजार समित्यांमधील विविध कृषी उत्पादनाच्या उलाढालीची आकडेवारी तक्ता क्रमांक ६ मध्ये दिली आहे.

**कराड कृषी उत्पादन बाजार समिती** (स्थापना १ ऑक्टोबर १९४४) : कराड तालुक्यापुरते मर्यादित कार्यक्षेत्र असलेल्या या बाजार समितीत १३६ खेड्यांचा समावेश होता. उंब्रज व मसूर येथे उपबाजार आहेत. मुख्य बाजार आवाराचे क्षेत्र ९.८३ हेक्टर व उंब्रज उपबाजाराचे क्षेत्र २.२२ हेक्टर आहे. येथे भुईमूग शेंगाची मोठी उलाढाल चालते. मसूर उपबाजार आवारात हळदीची उलाढाल मोठ्या प्रमाणात होते. येथून पुणे, मुंबई, चेन्नई (मद्रास), कलकत्ता, चिपळूण व खेडला माल पाठविला जातो.

बाजार समितीच्या आवारात आक्टोबर १९६४ पासून जनावरांचा बाजार भरविण्यात येतो. कराड व मसूर येथे जनावरांचा तर कराड, चरेगाव व काले येथे शेळ्या मेंढ्याचा आठवडी बाजार भरविला जातो. कराड ही देशातील जनावरांची मोठी बाजारपेठ गणली जाते. येथे गुजरात, दिल्ली, पंजाब, कर्नाटक इत्यादी राज्यातून दुभत्या जनावरांची आवक फार मोठ्या प्रमाणात होते. सांगली, कोल्हापूर, रत्नागिरी, अहमदनगर, मुंबई, बीड व सोलापूर येथील व्यापारी जनावरांच्या खरेदी-विक्रीसाठी कराड येथे येतात. गुरा व म्हैसाना जातीच्या म्हशी खरेदी-विक्रीसाठी गुजरात, राजस्थान व दिल्ली येथून व्यापारी येतात. १९९६-९७ या वर्षी ३,९१७ जनावरांचे व ३५,१५३ शेळ्या-मेंढ्याचे व्यापारी आले होते. जनावरांच्या व शेळ्यामेंढ्यांच्या खरेदी-विक्रीच्या बाजार शुल्काद्वारे बाजार समितीस १,०२,०१,४७५ रुपये उत्पन्न मिळाले.

सन १९९२-९३ मध्ये समितीच्या मुख्य व उपबाजार आवारात १,०२,८९,६३५ रुपये किमतीच्या कृषी मालाची व बैल १,५९१ (किंमत ५६,०६,५३५ रुपये), गायी ८३२ (किंमत ४२,९१,३२५ रुपये), म्हशी १,५२७ (किंमत ६४,२४,५५० रुपये), शेळ्या ८,६५६ (किंमत ३९,००,१४५ रुपये) व मेंढ्या १५,३५३ (किंमत ६५,३०,४३० रुपये) या पशुधनाची उलाढाल झाली. तर १९९६-९७ मध्ये बैल १,५२३ (किंमत ६७,८४,९५५ रुपये), गायी ४४९ (किंमत २९,०४,७०० रुपये), म्हशी १,९२० (किंमत १,५०,२२,२७० रुपये), रेडे २५ (किंमत ५०, ३१५ रुपये) शेळ्या १४,२४० (किंमत ९८,३४,५०५ रुपये) व मेंढ्या २०,९१३ (किंमत १,०८,१७,१५५ रुपये) विक्री झाली होती.

**कोरेगाव कृषी उत्पादन बाजार समिती** (स्थापना १ डिसेंबर १९४९) : या बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात कोरेगाव तालुक्यातील ७६ खेड्यांचा समावेश आहे. मुख्य बाजार कोरेगावला असून वाठार (रेल्वे स्टेशन) व रहिमतपूर येथे उपबाजार आहेत. मुख्य बाजार आवाराचे क्षेत्र ३.६४ हेक्टर असून वाठार व रहिमतपूर उपबाजार प्रत्येकी १.६० हेक्टर आकाराचे आहेत. कोरेगाव विनियमित बाजारात कृषी मालाबरोबरच १९५९ पासून जनावरांचेही विनियमन होते. महाराष्ट्र राज्य को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन व कोरेगाव तालुका शेतकरी सहकारी संघामार्फत येथे घेवड्याची मोठ्या प्रमाणात उलाढाल होते. व्यापारी पेढ्यांमार्फत खरेदी केलेला घेवडा दिल्ली येथे पाठविला जातो. धणे प्रामुख्याने तामिळनाडू व आंध्र प्रदेशात व बटाटे मुंबईस पाठविले जातात. ओली मिरची पुणे, मुंबई व कर्नाटकातील होसपेटला पाठविली जाते. समितीने १९६८ पासून कोरेगावला जनावरांचा आठवडी बाजार सुरू केला आहे. सन १९९२-९३ मध्ये उत्पन्न व खर्च अनुक्रमे १०,४८,१४३ व ६,८०,८६१ रुपये होता. याचवर्षी आवारात ६,२३,०४,३५० रुपये किंमतीच्या ६९,३११ क्विंटल कृषी मालाची उलाढाल झाली. सन १९९५-९६ मध्ये उत्पन्न व खर्च अनुक्रमे १३,२९,९०१ व ८,३०,६६१ रुपये होता.

अनुक्रमणिका

**फलटण कृषी उत्पादन बाजार समिती** (स्थापना १५ फेब्रुवारी १९५२) : बाजार समितीचे कार्यक्षेत्र संपूर्ण फलटण तालुका असून बरड येथे उपबाजार आहे. मुख्य बाजार आवाराचे क्षेत्र ९.४ हेक्टर असून बरड उपबाजाराचे २.३ हेक्टर आहे. येथून कापूस मुंबईस व लोकर दिल्लीला पाठविली जाते. गहू व ज्वारी कोल्हापूर व पुणे आणि खपली गहू कर्नाटक राज्यात पाठविला जातो. शिवाय जनावरांचेही विनियमन केले जाते. बाजार समितीचे १९९१-९२ मध्ये उत्पन्न व खर्च अनुक्रमे १३,७३,४९४ व १२,१९,६९४ रुपये होता. १९९२-९३ मध्ये गाई ८९५, बैल ७२०, म्हशी १८१, शेळ्या १,८८९, मेंढ्या १७,९४१ व एक रेडा या पशुधनाची विक्री झाली. १९९५-९६ मध्ये उत्पन्न व खर्च अनुक्रमे २०,०५,८११ व २१,६३,१९८ रुपये होता.

**सातारा कृषी उत्पादन बाजार समिती** (स्थापना १२ मे १९५२) : या समितीच्या कार्यक्षेत्रात सुरुवातीस सातारा, वाई व जावळी तालुक्यांचा समावेश होता. त्यानंतर १९७६ मध्ये महाबळेश्वर तालुक्याचा समावेश करण्यात आला. या कार्यक्षेत्राचे १९ मार्च १९८० रोजी विभाजन करून सातारा व वाई येथे स्वतंत्र बाजार समित्या अस्तित्वात आल्या. सातारा समितीच्या कार्यक्षेत्रात सातारा तालुक्यातील १८५ व जावळी तालुक्यातील २०७ गावे आहेत. मुख्य बाजार आवार ४.४१ हेक्टर आहे. अतित (स्थापना १९५९) व वडूथ (स्थापना १९५६) येथे उपबाजार असून त्यांचे क्षेत्र अनुक्रमे ०.५२ हेक्टर व १.२१ हेक्टर आहे. सातारा ही बटाट्याची मोठी बाजारपेठ असून त्याशिवाय या बाजार आवारात गहू, ज्वारी, मूग, उडिद, हरभरा, चवळी, घेवडा, तूर, हळद, धणे, कांदे व गूळ या कृषिमालांचेही विनियमन केले जाते. ऑक्टोबर १९६६ पासून जनावरांच्या खरेदी-विक्रीचे विनियमन सुरु झाले. १९९२-९३ मध्ये समितीचे उत्पन्न व खर्च अनुक्रमे १२,४२,८४९ रुपये व ११,५३,४८२ रुपये होता. त्यावर्षी बैल १,००९ (किंमत २२,७६,९०० रुपये) गायी १,०५३ (किंमत ५८,०२,३२१ रुपये), म्हशी ८१८ (किंमत २२,९५,८५० रुपये), रेडे १४ (किंमत १३,५०० रुपये), व शेळ्या-मेंढ्या २,४०३ (किंमत ११,६१,९५० रुपये) या पशुधनाची खरेदी-विक्री झाली. १९९५-९६ मध्ये समितीचे उत्पन्न व खर्च अनुक्रमे १६,१५,३०२ रुपये व १६,०३,४६४ रुपये होता.

**वडूज कृषी उत्पादन बाजार समिती** (स्थापना १ ऑगस्ट १९६५) : या समितीचे कार्यक्षेत्र खटाव तालुक्यापुरते मर्यादित असून वडूज येथे मुख्य बाजार आवार आहे. पुसेगाव (१९८४) व पुसेसावळीला (१९९०) उपबाजार आहेत. वडूज ही जिल्ह्याच्या पूर्व भागातील मुख्य बाजारपेठ असून ती गूळ व घेवडा यासाठी प्रसिद्ध असून येथे तांदळाचेही विनियमन केले जाते. सन १९९२-९३ मध्ये समितीचे उत्पन्न व खर्च अनुक्रमे ८,७३,४६२ व ८,६७,९०७ रुपये होता. त्यावर्षी गायी ६४७ (किंमत ३,३२,११० रुपये), म्हशी ७४७ (किंमत ११,३४,९४५ रुपये), रेडे ६८० (किंमत १,७९,०१५ रुपये), बैल १,७१६ (किंमत ३२,२३,०७५ रुपये), शेळ्या १५,००० (किंमत ३६,१३,०७५ रुपये), मेंढ्या १२,०७७ (किंमत ३०,००,००० रुपये), संकरीत गायी ९३ (किंमत ६,४१,५२५ रुपये) व गाढवे ५ (किंमत ४,५०० रुपये) पशुधनाची खरेदी-विक्री झाली. १९९५-९६ मध्ये समितीचे उत्पन्न व खर्च अनुक्रमे १२,७६,०४७ व ११,८७,५३९ रुपये होता.

**'मल्हारपेठ कृषी उत्पादन बाजार समिती, तालुका पाटण** (स्थापना ऑक्टोबर १९६८) : या समितीचे मुख्य बाजार आवार पाटणला असून त्याचे क्षेत्रफळ २.१४ हेक्टर आहे. मानेवाडी, मल्हासेठ व तारळे येथे उपबाजार आहेत. येथे भुईमूगाच्या शेंगाची मोठी आवक व विक्री होते. मानेवाडी उपबाजार आवारात १६ फेब्रुवारी १९८३ पासून जनावरांचा आठवडी बाजार भरतो. १९९२-९३ मध्ये समितीचे उत्पादन उत्पन्न व खर्च अनुक्रमे ४.२६,६२२ व ३,५०,८१० रुपये होता. त्यावर्षी गायी २६६ (किंमत ११,४६,३३० रुपये), बैल १,५६० (किंमत ३४,२९,०१२ रुपये), म्हशी १,६८९ (किंमत २९,६६,०५८ रुपये), रेडे २२६

(किंमत १३,३०४ रुपये), शेळ्या ५,२५९ (किंमत २२,०२,१९४ रुपये) व मेंढ्या २२७ (किंमत ७७,५२५ रुपये) पशुधनाची उलाढाल झाली.

**लोणंद कृषी उत्पादन बाजार समिती** (स्थापना ५ मे १९६९) : या समितीचे कामकाज १९५२ पासून फलटण कृषी उत्पादन बाजार समितीचे देखरेखीखाली चालत असे. सन १९६९ पासून लोणंद समितीचे कामकाज स्वतंत्रपणे सुरू झाले. समितीच्या कार्यक्षेत्रात खंडाळा तालुक्यातील तीन निमशहरे व ५८ खेड्यांचा समावेश आहे. मुख्य बाजार आवार सहा हेक्टर असून शिरवळ व खंडाळा येथे उपबाजार आहेत. त्यांचे क्षेत्र अनुक्रमे २.४४ व २.६० हेक्टर आहे. लोणंद ही कांद्याची प्रसिद्ध बाजारपेठ असून येथे सातारा, पुणे व सोलापूर जिल्ह्यांतून कांद्याची मोठी आवक होते. चांगल्या प्रतीचा कांदा प्रामुख्याने श्रीलंका व अरब राष्ट्रांमध्ये निर्यात होतो. कर्नाटक, तामिळनाडू, दिल्ली उत्तर प्रदेश व बिहार राज्यांमध्येही चांगला कांदा पाठविला जातो. येथील जनावरांचा बाजार प्रसिद्ध आहे. आठवड्याला सुमारे दोन हजार शेळ्या-मेंढ्या विक्रीसाठी येतात. सन १९९२-९३ मध्ये एकूण उत्पन्न व खर्च अनुक्रमे १५,११,०१६ आणि ८,०९,२८९ रुपये होता. या वर्षी गायी १.१५३ (विक्री ३३८), म्हशी ९७८ (विक्री ९७ ), बैल ३,३९६ (विक्री १,१५९), शेळ्या ३३,८२१ (विक्री २५,७५७) व मेंढ्या ३३,९८० (विक्री २८,९३२) या पशुधनाची आवक व विक्री झाली. १९९५-९६ मध्ये समितीचे उत्पन्न व खर्च अनुक्रमे २२,१९,७८१ व १५,४१,८७२ रुपये होता.

**दहिवडी कृषी उत्पादन बाजार समिती, तालुका माण** (स्थापना ९ मार्च १९७०) : प्रारंभी बाजार समितीचा मुख्य बाजार गोंदवले बु॥ येथे होता. तो १९७२ मध्ये दहिवडी येथे स्थलांतरित करण्यात आला. समितीच्या कार्यक्षेत्रात ७६ गावे असून गोंदवले व म्हसवडला उपबाजार आहेत. कृषिमालांचे विनियमन बरोबरच म्हसवडची शेळ्या-मेंढ्यांची यात्रा व नागोबा जनावरांची यात्रा बाजार समितीकडे आहे. जनावरे कोंबड्या व कातडी यांचेही विनियमन करण्यात येते. सन १९९२-९३ मध्ये समितीचे उत्पन्न व खर्च अनुक्रमे ६,७९,८२५ व ६,०३,४७५ रुपये होता. त्या वर्षी गायी २,१३९ (किंमत २६,४४,६९५ रुपये), बैल १,५९१ (किंमत २७,७०,१२० रुपये), म्हशी ८३७ (किंमत ७,६७,२२५ रुपये), रेडे २६१ (किंमत १,२८,८९५ रुपये), घोडे ८० (किंमत ७८,१८५ रुपये ), शेळ्या १७,९७१ (किंमत ३८,१०,१५५ रुपये), व मेंढ्या ३०,९८४ (किंमत ७७,९४,०६५ रुपये) पशुधनाची खरेदी-विक्री झाली. १९९५-९६ मध्ये समितीचे उत्पन्न व खर्च अनुक्रमे १०,३६,२१२ व ९,२५,९१२ रुपये होता.

**वाई कृषी उत्पादन बाजार समिती** (स्थापना १९ मार्च १९८१) : या समितीचे मुख्य बाजार आवार वाई-सोनगिरवाडी येथे असून क्षेत्र दोन हेक्टर आहे. पाचवड व भुईंज येथे उपबाजार आहेत. येथे बाजरी, गहू, ज्वारी, उडिद, घेवडा, हळद, धणे, गूळ, भुईमूग या कृषिमालांचे विनियमन होत असले तरी हळदीचा व्यापार मोठा असतो. येथील शेतीमाल गुजरात, दिल्ली, सांगली, कोरेगाव इत्यादी ठिकाणी पाठविला जातो. १९९२-९३ मध्ये बैल २,४८७ (किंमत ६०,३५,५९९ रुपये), गायी २,९४१ (किंमत ३,०४,०६,१४७ रुपये), म्हशी व रेडे २,९०० (किंमत ५८,६२,४६५ रुपये), शेळ्या व मेंढ्या ७,९०२ (किंमत ३८,५१,४१२ रुपये), व इतर पशुधन १० (किंमत ३६,३०० रुपये) यांची समितीच्या आवारात खरेदी-विक्री झाली. १९९५-९६ मध्ये समितीचे उत्पन्न व खर्च अनुक्रमे १३,६८,०८९ व ९,९४,२९५ रुपये होता.

अनुक्रमणिका

## सहकारी विपणन

शेतकऱ्याच्या मालास योग्य भाव मिळण्यासाठी सहकारी खरेदी-विक्री संघ स्थापन करण्यात आले. पतपुरवठा शेतमालाशी संलग्न केल्यामुळे या संघांद्वारे मालाची योग्य भावाने विक्री करून शेतकऱ्यांच्या गरजा भागविणे सुकर झाले आहे. तालुका पातळीवरील खरेदी-विक्री संघ प्राथमिक विपणन संस्था म्हणून ओळखली जाते. शेतीसाठी अवजारे, बी-बीयाणे व खते पुरविणे आणि शेतमालाची किफायतशील विक्री करणे ही प्राथमिक विपणन संस्थांची कर्तव्ये आहेत. सातारा जिल्हा खरेदी विक्री संघाची स्थापना २५ जानेवारी १९६२ रोजी झाली. त्यानंतर प्रत्येक तालुक्यात खरेदी विक्री संघ स्थापन करण्यात आले. सन १९९२-९३ मध्ये कार्यरत असलेल्या संघांची आकडेवारी तक्ता क्रमांक ७ मध्ये दिली आहे.

## ग्राहक संस्था

ग्राहकोपयोगी वस्तू रास्त दराने उपलब्ध करून देण्यासाठी १९४२ मध्ये साताऱ्यास रयत सेवक सहकारी ग्राहक भांडार ही पहिली ग्राहक सहकारी संस्था स्थापन झाली. रेशनिंगच्या काळामध्ये एकूण १७ ग्राहक संस्था स्थापन करण्यात आल्या होत्या. [**जिल्हा जनगणना निर्देश ग्रंथ**, सातारा, १९६१, पृष्ठ ३६.] जुन १९९१-९२ मध्ये नऊ घाऊक व ९८ प्राथमिक ग्राहक सहकारी संस्था होत्या. त्यांची सभासद संख्या अनुक्रमे १७,८०६ व ३७,३९९ आणि वसूल भाग भांडवल अनुक्रमे ७४,०६ हजार रुपये व ३०,०८ हजार रुपये होते. जिल्ह्यातील ग्राहक संस्थांची माहिती खाली दिली आहे.

(हजार रुपये)

| बाब | | घाऊक | | प्राथमिक | |
|---|---|---|---|---|---|
| | | १९८२-८३ | १९९५-९६ | १९८२-८३ | १९९५-९६ |
| संस्था | . . | २ | १३ | ३३ | १०३ |
| सभासद | . . | १,९१८ | २१,२८७ | १५,५७० | ३५,७५६ |
| वसूल भाग भांडवल | . . | ८१३ | १२,५६१ | १,०९० | १६,७०८ |
| निधी | . . | ७९४ | ५,१२२ | ८९२ | ७,९७० |
| ठेवी | . . | १८१ | ७,६२८ | ४२२ | १,९८८ |
| कर्जे | . . | १,६५३ | . . | १,३५३ | . . |
| खरेदी | . . | २८,०३८ | १४,०९८ | ८,१८१ | ३,६०८ |
| विक्री | . . | ३१,७०३ | १,९३,८१३ | ९,४४२ | ५६,०४७ |
| नफा | . . | १० | ८२८ | १३२ | ९६ |
| तोटा . . | . . | .. | ५ | ११६ | २ |

अनुक्रमणिका

## राज्य व्यापार आणि रास्त भावाची दुकाने

दुसऱ्या जागतिक महायुद्ध काळात सर्वच जीवनोपयोगी वस्तूंची तीव्र टंचाई निर्माण झाली. त्यामुळे भाव वाढून काळ्या बाजारास प्रोत्साहन मिळून लोकक्षोभ वाढीत भर पडली. प्राप्त परिस्थितीत परकीय सत्तेला लोकक्षोभ कमी करण्यासाठी रेशनिंग योजना कार्यान्वित करणे भाग पडले. मुंबई शहरात प्रथम रेशनिंग सुरू केल्यावर (१९४३) त्या योजनेची व्याप्ती इतरत्र वाढवावी लागली. सन १९४३ व १९४४ मधील शेती हंगाम अधिकच खराब झाल्यामुळे प्रश्न अधिक बिकट झाला. म्हणून शासनाने सक्तीच्या लेव्ही पद्धतीने वस्तू हस्तगत करून अधिकृत शिधावाटप दुकानांतून अन्नधान्य, साखर, कापड व रॉकेलचे वाटप सुरू केले. शिधापत्रिकेवर वाटप करण्यासाठी लागणारा अन्नधान्याचा पुरवठा सक्तीच्या लेव्ही पद्धतीने गोळा करताना शेतकऱ्यांवर बराच अन्याय झाला. लेव्ही पद्धतीत वेळोवेळी बदल करण्यात आले. सन १९५६ मध्ये अन्नधान्याचे उत्पादन कमी झाल्यामुळे तसेच १९६२-६४ या कालावधीत वस्तूंच्या किंमती वाढल्यामुळे पुन्हा स्वस्त धान्य दुकानांद्वारे जनतेला अन्नधान्य पुरवठा करण्यात आला.

सप्टेंबर १९६० मध्ये जिल्ह्यात २७३ रास्त भावाची दुकाने होती. त्यापैकी ४५ दुकाने ग्रामपंचायतींकडून, ६२ दुकाने सहकारी संस्थाद्वारे व १७६ दुकाने खाजगी दुकानदारांकडून चालविली जात होती. सन १९५९ ची दुष्काळी परिस्थिती, १९६२ मधील चिनी आक्रमण व १९६५ चे पाकिस्तानी आक्रमण यामुळे जीवनावश्यक वस्तूंचे भाव आणखीच भडकले. त्यामुळे शासनाने दुकानांच्या संख्येत वाढ केली. सन १९७०-७१ मध्ये दुकानांची एकूण संख्या ६८५ होती. सन १९८७-८८ मध्ये दुकानांची तालुकानिहाय संख्या पुढीलप्रमाणे होती :- सातारा १६३, कराड २३१, पाटण १४६, जावळी ६४, फलटण ९९, वडूज (ता. खटाव) १०६, दहिवडी (ता. माण) ९३, खंडाळा ५५, वाई ७६, महाबळेश्वर ३५ व कोरेगाव १०६. सन १९९२-९३ मध्ये जिल्ह्यात १,४४० रास्त भावाची दुकाने होती. सन १९९५-९६ मध्ये जिल्ह्यात २०,७०० टन तांदूळ, २३,००० टन गहू व १२,००० टन साखरेचे रास्त भावाच्या दुकानांमधून वितरण करण्यात आले.

## साप्ताहिक बाजार

आठवडे बाजाराची पद्धती फार प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. अन्नधान्य, डाळी, तेल मिरची, मसाले, गूळ, कापड, फळे, भाज्या, तांबे-पितळीची भांडी इत्यादी वस्तू बाजारात विक्रीसाठी आणल्या जातात. पूर्वीच्या बाजारांमध्ये स्थानिक वस्तूंची विशेषत: शेतमालाची विक्री होत असे. हे बाजार म्हणजे मालाचे वितरण करणारी केंद्रे होती. बाजाराच्या दिवशी फेरीवाले व व्यापारी आपापली दुकाने बाजारात लावतात. जवळपासच्या खेड्यातील शेतकरीही शेतमाल विक्रीस आणतात. सन १८८२ मध्ये साप्ताहिक आणि द्विसाप्ताहिक असे ३४ बाजार होते. सन १९५१ मध्ये ९८ व १९६१ मध्ये १२५ बाजार होते. [**सेन्सस ऑफ इंडिया**, १९६१, व्हा. १०, पार्ट सेवन-सी, **महाराष्ट्र**, पृ. १५.] सन १९८९ मध्ये १११ आठवडे बाजार होते. त्यांची तालुकानिहाय संख्या पुढीलप्रमाणे होती :- सातारा ६, कराड १९, पाटण १९, जावळी ४, फलटण १५, खंडाळा ३, खटाव १४, माण १४, वाई ५, कोरेगाव १० व महाबळेश्वर २.

अनुक्रमणिका

# यात्रा

बहुतांश यात्रा स्थानिक साधुसंतांच्या किंवा धार्मिक उत्सवांनिमित्त भरतात. मोठ्या यात्रेत जनावरांची खरेदी-विक्री मोठ्या प्रमाणात होते. सन १८८२ मध्ये एकूण १८ ठिकाणी यात्रा भरत होत्या. या यात्रांमधून ३०,००० रुपये पर्यंत व्यापारी उलाढाल होत असे. सन १९६१ मध्ये जिल्ह्यात २८० लहानमोठ्या यात्रा भरत होत्या. त्यांची तालुकानिहाय संख्या पुढीलप्रमाणे होती :- खंडाळा २०, फलटण २३, वाई ३८, महाबळेश्वर ९, जावळी १४, कोरेगाव ३७, खटाव २८, माण १५, सातारा ४६, पाटण २७, व कराड ४३. काही यात्रा एक ते तीन दिवस तर काही आठवडाभर चालणाऱ्या असतात. पौष १५ रोजी (डिसेंबर-जानेवारी) भरणारी औंध येथील यमाई देवीची यात्रा, चैत्र शुद्ध ५ ते १५ (मार्च-एप्रिल) व माघ वद्य १४ रोजी (जानेवारी-फेब्रुवारी) भरणारी शिंगणापूर येथील शंभू महादेवाची यात्रा, चैत्र शुद्ध ९ रोजी (मार्च-एप्रिल) भरणारी परळी येथील रामनवमी यात्रा, पौषमध्ये (डिसेंबर-जानेवारी) भरणारी पाल येथील खंडोबाची यात्रा, कार्तिक व मार्गशीर्षमध्ये (नोव्हेंबर-डिसेंबर) भरणारी म्हसवड येथील सिद्धनाथ यात्रा, मार्गशीर्ष वद्य ९ ला (नोव्हेंबर-डिसेंबर) भरणारी पुसेगाव येथील सेवागिरी महाराज पुण्यतिथी उत्सव व मार्गशीर्ष वद्य दशमीला भरणारी गोंदवले बु॥ येथील गोंदवले महाराजांची पुण्यतिथी यात्रा या मोठ्या यात्रा होत.

**शिखर शिंगणापूर :** पुराण इतिहास, धर्म आणि राजकारण या क्षेत्राशी नाते सांगणारे महाराष्ट्रातील भाविकांचे प्रसिद्ध ठिकाण. यास महादेवाचा डोंगर असेही म्हणतात. येथे श्री शंभू महादेवाचे पुरातन भव्य मंदिर असून तीर्थक्षेत्र व अनेकांचे कुलदैवत म्हणून प्रसिद्ध आहे. हे मंदिर साताऱ्याचे छत्रपती राजे भोसले यांच्या खाजगी मालकीचे आहे. येथे शिवरात्रीचा उत्सव मोठ्या प्रमाणात होत असला तरी चैत्र पंचमी ते पौर्णिमा या काळात वार्षिक उत्सव होत असतो. पंचमीस देवास हळद लावून यात्रेस प्रारंभ होतो व अष्टमीस देवाचा लग्न सोहळा (प्रतीकात्मक) संपन्न होतो. या यात्रेस मोठया प्रमाणात भाविक महाराष्ट्रातून व इतर राज्यातूनही येतात. चैत्र द्वादशीला यात्रेकरू अनेक भागातून पाण्याच्या कावडी भरून येथे आणतात. येथून तिरूपतीच्या बालाजीसाठी काठी व हिमालयातील अमरनाथला छडी घेऊन जातात. यात्रेमध्ये करमणुकीसाठी फिरती सिनेमागृहे, लोकनाटये व इतर करमणुकीची साधने, सर्व प्रकारची दुकाने व उपहारगृहे इत्यादी असतात. यात्रा काळात अशा दुकानांतून अदमासे ४० लाख रुपयांची उलाढाल होते. यात्रेपासून ग्रामपंचायतीस अंदाजे एक लाख रुपये उत्पन्न मिळते. तसेच शासनाकडून ग्रामपंचायतीस यात्रेसाठी तीन लाख रुपये अनुदान दिले जाते.

**सज्जनगड :** येथे श्रीराम मंदिरात नित्य पूजा, करूणाष्टके व **दासबोध** पारायण इत्यादी कार्यक्रम होतात. गडावर प्रतिवर्षी माघ वद्य प्रतिपदा ते नवमी हा दासनवमीचा मोठा उत्सव साजरा होतो. तसेच दासनवमी व रामनवमीच्या दिवशी मोठी यात्रा भरते.

**पुसेगाव : सेवागिरी महाराज यात्रा :** सेवागिरी महाराजांच्या वास्तव्यामुळे व त्यांच्या समाधिस्थानामुळे हे प्रसिद्ध तीर्थक्षेत्र गणले जाते. या सत्पुरुषाच्या स्मृतिप्रीत्यर्थ मार्गशिर्ष वद्य चतुर्दशीला मोठी यात्रा भरते. ही यात्रा दहा दिवस चालते. यावेळी होणाऱ्या रथोत्सवास भाविक लाखो रुपयांची देणगी देतात. ही यात्रा बैलाच्या खरेदी-विक्रीसाठी प्रसिद्ध आहे. सेवागिरी ट्रस्टने १९९४ मध्ये समाधिस्थानाचा जीर्णोद्धार करून भाविकांसाठी पाच मजली धर्मशाळा बांधली आहे.

अनुक्रमणिका

**म्हसवड : श्री सिद्धनाथ यात्रा :** राजेमाने यांचे म्हसवड म्हणून प्रसिद्ध असलेल्या या गावी सिद्धनाथाचे पुरातन मंदिर असून येथे दरवर्षी मार्गशीर्ष शुद्ध प्रतिपदेस मोठी यात्रा भरते. या दिवशी सिद्धनाथांच्या मूर्तीची रथातून समारंभपूर्वक मिरवणूक काढतात. यात्रेस महाराष्ट्रातून व इतर राज्यातून अदमासे दोन लाख भाविक जमतात. यात्रेमध्ये करमणुकीसाठी फिरती सिनेमागृहे, लोकनाट्ये व इतर करमणुकीची साधने, मिठाईची दुकाने, उपहारगृहे व इतर सर्व प्रकारची दुकाने लावली जातात. यात्रा काळात दरवर्षी रुपये २५ लाखांपेक्षा जास्त उलाढाल होते. यात्रेपासून नगरपालिकेस अंदाजे दीड लाख रुपये उत्पन्न मिळते.

**गोंदवले बु॥ : श्री ब्रह्मचैतन्य महाराज यात्रा :** या ठिकाणी श्री. सदगुरु ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांची समाधी आहे. मार्गशीर्ष वद्य दशमीस येथे पुण्यतिथी सोहळा मोठ्या प्रमाणत होतो. यावेळी सर्व महाराष्ट्रातून व इतर राज्यातील भाविक लोक जमतात.

**पाल : खंडोबा यात्रा :** खंडोबा हे महाराष्ट्र व कर्नाटक राज्यातील लोकांचे कुलदैवत आहे. मंदिर तारळी नदीच्या डाव्या तिरावर असून ते सुमारे ५०० ते ५५० वर्षापूर्वी बांधले असावे. सन १८८५ मध्ये या देवस्थानास शासनाकडून यात्रेकरिता वार्षिक ३०० रुपये अनुदान मिळत होते. देवस्थानातर्फे वर्षातून अनेक उत्सव होतात व यात्राही भरतात. पूर्वी प्रत्येक यात्रेकरूकडून अनुदान यात्रा कर घेतला जात असे, आता फक्त मुख्य यात्रेसच यात्राकर घेतला जातो. अद्यापही शासनाकडून अनुदान मिळते. या देवाचा विवाह सोहळा पौष शुद्ध १३ रोजी होतो. यात्रेत ५ ते ६ लाख लोक, सुमारे ४,००० दुकाने, लोकनाट्ये, फिरती सिनेमागृहे येतात. सन १९९५-९६ मध्ये ग्रामपंचायतीस रुपये ५६,४३६ यात्राकर मिळाला होता.

**कोळे : घाडगेनाथ महाराज यात्रा :** प्रत्येक वर्षी माघ शुक्ल षष्ठीस भरते. यात्रेस ५०,००० भाविक, १०० दुकाने, सिनेमागृहे व इतर करमणुकीची साधने येतात. सन १९९५-९६ मध्ये यात्रेत पाच लाख रुपयांची उलाढाल झाली. तसेच ग्रामपंचायतीस ४,००० रुपये यात्राकर प्राप्त झाला.

**फलटण :** येथे संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखीचा मुक्काम दरवर्षी होत असल्याने ज्ञानेश्वरांच्या पालखीचे दर्शन घेण्यासाठी साधारण एक लाख भाविक जमतात. तसेच मार्गशीर्ष शुद्ध प्रतिपदेला रामाचा रथोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा करतात.

**बावधन :** येथे भैरवनाथाची यात्रा फाल्गुन कृष्ण पक्ष १५ ला भरते. गाड्यावर एक लाकडी खांब बसवून त्यावर आडवे लाकूड बांधलेले असते (यास बगाड म्हणतात.) आडव्या लाकडावर नवस बोललेल्या व्यक्तिस पाठीस दोर बांधून अधांतरी लोंबकळत ठेवतात. हे या यात्रेचे मुख्य वैशिष्ट्य होय. बगाड पाहण्यास भाविक जमतात. याशिवाय फुलेनगरचे बगाडही विशेष प्रसिद्ध आहे.

**मांढरदेव :** हे काळूबाई देवीचे स्थान म्हणून प्रसिद्ध असून येथे पौष शुद्ध १५ ला मोठ्या प्रमाणात यात्रा भरते. ही जिल्ह्यातील मोठ्या यात्रांपैकी एक असून येथे दीड लाखांच्यावर भाविक येत असल्याने मोठी व्यापारी उलाढाल होते.

**नागठाणे राम रथयात्रा :** येथे राम रथ यात्रा पौष शु. ४ ते पौष शुद्ध १० (जानेवारी-फेब्रुवारी) या कालावधीत दहा दिवस भरते. मुख्यत: ही यात्रा बैल बाजारासाठी प्रसिद्ध आहे. येथे मोठ्या प्रमाणात

बैलांची खरेदी-विक्री होत असते. इतर वस्तूंचीही मोठ्या प्रमाणात विक्री होत असते. रामाच्या रथाची मिरवणूक काढली जाते. या दिवशी आसपासच्या खेड्यांतील हजारों भाविक येतात. येथे फिरती सिनेमागृहे व लोकनाट्ये येतात.

## वजने व मापे

मौल्यवान खडे, हिरे, माणके, पाचू आणि मोती याचे वजन करण्यासाठी २४ रती = एक टाक असे कोष्टक होते. एक रती चार गव्हाच्या दाण्यांएवढे किंवा १६ तांदळाच्या दाण्यांएवढे असे. साधारणतः पाच टाकांचा एक तोळा असे. ही वजने गारगोटीसारख्या टणक दगडांपासून बनविलेले आकाराने चपटे किंवा गोल असत. सोने व चांदीच्या वजनासाठी आठ गुंजा = एक मासा, बारा मासे = एक तोळा (११.६६ ग्रॅम), चोवीस तोळे = एक शेर आणि चाळीस शेर = एक मण हे कोष्टक वापरले जाई. (गुंज ही गुंजेच्या झाडाचे "बी" असते.) मासा किंवा तोळ्याचा आकार साधारणतः चौरसाकृती, गोलाकार किंवा लंबगोलाकार आकाराचा असे. ते स्फटिक, काच फुटलेल्या चिनीमातीच्या भांड्याचे तुकडे, शिसे तांबे किंवा काशाच्या धातूपासून बनविलेले असत. तोळ्यासाठी ११⅛ मासे वजन असलेला इंपिरिअल रुपयाचा (१०.९३ ग्रॅम वजनाचे प्रचलीत चलन) वापर करीत. लोखंड, जस्त, पितळ, शिसे, कथील आणि इतर मौल्यवान नसलेले धातू तसेच कापसाचे वजन करण्यासाठी दोन अर्धा छटाक = एक छटाक (५८.३२ ग्रॅम), दोन छटाक = एक अदपाव, दोन अदपाव = एक पाव, (२३३.२८ ग्रॅम) दोन पाव = एक अच्छेर, दोन अच्छेर = एक शेर (९३३.१० ग्रॅम), तेरा शेर = एक मण (११.२० कि. ग्रॅ.) आणि वीस मण = एक खंडी (२२४ कि. ग्रॅ.) हे परिमाणाचे कोष्टक वापरले जाई. अर्धा छटाकाचे वजन साधारणतः अडीच इंपिरिअल रुपयांएवढे आणि एक शेर साधारणतः ७६ इंपिरिअल रुपयांच्या वजनाएवढे असे. मसाले, साखर, काकवी (गूळ), क्षार, कॉफी व इतर उत्तेजक पदार्थांच्या वजनासाठी वरील परिणामाबरोबर दोन सव्वाशेर = एक अडशेरी, दोन अडशेरी = एक पासरी, दोन पासऱ्या = एक धडा, चार धडे = एक मण आणि चोवीस मण = एक खंडी हे कोष्टक वापरले जाई. सव्वाशेरचे वजन तीस इंपिरिअल रुपयांएवढे होते.

तांदूळ, मीठ व इतर धान्ये मोजण्यासाठी प्रामुख्याने मापांचा व क्वचितच वजनांचा उपयोग केला जाई. मापाचे कोष्टक पुढीलप्रमाणे होते :- दोन निळवा = एक कोळवा, दोन कोळवा = एक चिपटा, दोन चिपटा = एक मापटा, दोन मापटा = एक शेर, दोन शेर = एक अडशेरी, दोन अडशेरी = एक पायली, सोळा पायली = एक मण आणि विस मण = एक खंडी. या मापांचा आकार वाळूच्या घड्याळाप्रमाणे होता. ही मापे लाकूड, लोखंड, तांबे किंवा पितळ यापसून तयार करून त्यावर सरकारी शिक्का मारीत असत. एक निळवा व अडशेरी मापे म्हणजे अनुक्रमे ६½ व २०८ इंपिरिअल रुपयांएवढे असते. दोन पावशेर = एक अच्छेर, दोन अच्छेर = एक शेर हे वजनी किंवा मापी कोष्टक तूप, लोणी, दूध व तेल यासाठी वापरले जाई. साखर व तांबे मोजण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या कोष्टकाप्रमाणे हे कोष्टक वापरले जाई. त्यासाठी दोन पावशेर = एक अच्छेर व दोन अच्छेर = एक शेर हे कोष्टक वापरीत. पावशेराचे वजन २० इंपिरिअल रुपयांइतके असे. यासाठी तांब्याची किंवा पितळेची मापे किंवा मातीचे लोटे वापरले जाई. माण, खटाव, खानापूर व तासगाव उपविभागांमध्ये तेलाच्या मापासाठी पळी व पावशेर, अर्धाशेर व एक शेराचा लोटा वापरीत. सुवासिक तेले आणि पावडरसाठी सोने व चांदी मोजण्याच्या वजनांचा उपयोग करीत. गजाची लांबी ३५ इंचाची असे. ती २४ तसूंमध्ये विभागलेली असे. गजापेक्षा वाराची लांबी एक तसूने जास्त असे. रेशमी पातळे किंवा पितांबर, दुपट्टा वजनावर विकले जाणारे किंमती कापड वगळता इतर कापड वार किंवा गजाने मापले जाई.

अनुक्रमणिका

पृष्ठभागाचे मोजमाप फुटात, यार्डात किंवा हाताने व वितीने करीत. गवंडीकामाचे मोजमाप घनफुटात करीत. लाकडाचे मोजमाप गजात करीत. खणलेल्या खड्ड्याचे मोजमाप चवकडीमध्ये करीत. चवकडी दहा हात लांब, दहा हात रुंद व एक हात खोल असे.

सन १८५३ च्या महसूल सर्वेक्षणापूर्वी जमिनीचे मोजमाप बिघा या परिमाणानुसार केले जात असे. त्याचे कोष्टक पुढीलप्रमाणे होते- ५$^{१}/_{६}$ हात किंवा ८$^{१}/_{८}$ फूट = एक काठी, २० काठ्या = एक पांड, २० पांड = एक बिघा व १२० बिघे = एक चाहूर. महसूल सर्वेक्षणानंतर जमिनीच्या मोजणीसाठी पुढील कोष्टक वापरात आले :- ३० फूट = एक आणा, १६ आणे = एक गुंठा व ३२ गुंठे = एक बिघा आणि ४० गुंठे = एक एकर.

शासकीय नियम व तपासणीच्या अभावी कित्येक व्यापारी दोन प्रकारची वजने व मापे वापरीत. अनेक ठिकाणी वजनाऐवजी दगडांचा उपयोग करण्यात येत होता. वजने व मापे जनतेच्या दैनंदिन व्यवहारांशी निगडित असल्यामुळे समानता आणण्याची गरज भासू लागली. त्यानुसार स्वातंत्र्यप्राप्तीनंतर कमीत कमी दोष असलेली मेट्रिक वजने, मापे वापरण्यासाठी भारतीय संसदेने १९५६ मध्ये मेट्रिक वजने मापे कायदा संमत केला. मुंबई शासनानेही १९५८ मध्ये मुंबई वजने मापे (अंमलबजावणी) अधिनियम (बॉम्बे वेटस् ॲंड मेझर्स एनफोर्समेंट ॲक्ट, १९५८) संमत केला. सन १९५८ पासून जिल्ह्यात या अधिनियमाची अंमलबजावणी सुरू झाली. तथापि, संक्रमण काळात १९६६ पर्यंत जुनी वजने मापे वापरण्यास परवानगी होती. त्यानंतर १९८५ मध्ये वजने, मापे, मानके अधिनियम, १९८५ संमत करण्यात आला. या अधिनियमाने कायद्यातील पूर्वीच्या काही त्रुटी घालविण्यात आल्या. सध्या सर्वत्र दशमान पद्धती रूढ झाली आहे. मात्र अजूनही खेड्यातील काही किरकोळ व्यवहार जुन्या परिमाणांनुसार होतात.

**तक्ता क्रमांक १**

**सातारा जिल्ह्यातील सहकारी संस्था, १९९५-९६**

| संस्था (१) | संख्या (२) |
|---|---|
| जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक .. .. .. | १ |
| प्राथमिक शेती पत पुरवठा .. .. .. | ८५८ |
| कृषक सेवा .. .. .. .. | ३ |
| नागरी सहकारी बँका .. .. .. .. | २० |
| पगारदार व नागरी पतपुरवठा .. .. .. | ७२८ |
| जिल्हा कृषि-औद्योगिक उत्पादन पणन .. .. | १ |
| तालुका खरेदी-विक्री संघ .. .. .. | ११ |
| प्राथमिक इतर पीक पणन .. .. .. | ६ |
| सहकारी साखर कारखाने .. .. .. | ८ |
| जिनिंग व प्रेसिंग .. .. .. .. | ६ |
| तेल गिरणी .. .. .. .. | १ |

अनुक्रमणिका

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| प्राथमिक शेती माल प्रक्रिया | | .. | .. | .. | २१ |
| मध्यवर्ती सहकारी दूध पुरवठा संघ | | .. | .. | .. | ८ |
| प्राथमिक दूध पुरवठा | .. | .. | .. | .. | १,३३७ |
| इतर पशु उत्पादन | .. | .. | .. | .. | ३४ |
| कुक्कुट पालन | .. | .. | .. | .. | ११४ |
| प्राथमिक सामुदायिक शेती | | .. | .. | .. | ९ |
| उपसा जलसिंचन | .. | .. | .. | .. | ५१८ |
| मच्छीमार सहकारी | .. | .. | .. | .. | ४१ |
| हातमाग सहकारी | .. | .. | .. | .. | ३ |
| यंत्रमाग सहकारी | .. | .. | .. | .. | १२ |
| इतर ग्रामीण उद्योग | .. | .. | .. | .. | १७ |
| सहकारी गृहनिर्माण | .. | .. | .. | .. | ६०४ |
| मजूर | .. | .. | .. | .. | २६८ |
| इतर सहकारी | .. | .. | .. | .. | ३१३ |

अनुक्रमणिका

तक्ते

## तक्ता क्रमांक २

### जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची आकडेवारी

(लाख रुपये)

| बाब (१) | १९५१ (२) | १९६१ (३) | १९७१ (४) | १९८१ (५) | १९९०-९१ (६) | १९९६-९७ (७) |
|---|---|---|---|---|---|---|
| भाग भांडवल .. .. | १.८१ | २६.६८ | ९१.४१ | १,७३.२७ | ४,४६.६८ | १२२६.६८ |
| राखीव इतर निधी .. .. | ०.२५ | ३.६५ | ४१.८० | २,१६.३२ | ७,००.२७ | २८९०.६५ |
| ठेवी .. .. | ८.७२ | १,३४.६६ | ५,९०.१२ | २६,६३.३८ | १,७४,५०.१९ | ४,८६,५३.३८ |
| कर्ज .. .. | ६.०१ | १,०९.६७ | १०,२२.८० | १५,९३.२० | ४८,३३.३१ | ४,०७,२२.२४ |
| कर्ज वसुलीचे प्रमाण (टक्के) .. .. | उ. ना. | ८७.६ | ७६.८ | ५२.९ | उ. ना. | ९५.३ |
| सभासद संख्या .. .. | १,९६६ | २,७०८ | ३,२४५ | ३,२३६ | ४,३३५ | ४,७०१ |

**तक्ता क्रमांक ३**

**जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने दिलेली कर्जे**

(लाख रुपये)

| कर्ज प्रकार | | ३० जून १९९१ | | ३० जून १९९६ | |
|---|---|---|---|---|---|
| | | लाभार्थी | रक्कम | लाभार्थी | रक्कम |
| इलेक्ट्रिक मोटार पंपसेट | .. | ८५ | १०.९० | १०७ | १९.२९ |
| ऑईल इंजिन | .. | ८ | ०.८२ | ८ | ०.८२ |
| पाईप लाईन | .. | १७३ | ९.६० | .. | .. |
| ऑईल इंजिन पाईप लाईन | .. | १५ | २.९१ | ८३ | १९.५० |
| इलेक्ट्रिक मोटार पाईप लाईन | .. | १२३ | २२.८७ | ३६० | १००.३४ |
| सार्वजनिक पाणी पुरवठा | .. | ५७३ | २१.५९ | १६ | ४.११ |
| तुषार सिंचन | .. | .. | .. | ४ | ०.९९ |
| ठिंबक सिंचन | .. | ७ | १.३० | ३६ | १२.५४ |
| गोबर गॅस | .. | ५२० | ३०.२४ | १०० | ५.०६ |
| रेशीम | .. | १० | ०.९८ | .. | .. |
| द्राक्ष बाग | .. | १५ | १०.७२ | ४२ | १५.९० |
| डाळिंब बाग | .. | ६ | ०.१३ | .. | .. |
| बोर बाग | .. | २ | ०.१३ | .. | .. |
| चिकू बाग | .. | १ | १.०१ | .. | .. |
| आंबा बाग | .. | २ | ०.०२ | .. | .. |
| मळणी यंत्र | .. | ११ | ०.८१ | ६ | ०.९६ |
| ट्रॅक्टर | .. | ९ | १२.२८ | १.६२ | १३५.७३ |
| सागवान शेती | .. | ८ | १.२५ | .. | .. |
| निलगिरी शेती | .. | ७ | ०.३७ | .. | .. |
| पानमळा | .. | ५ | ०.४१ | .. | .. |

**तक्ता क्रमांक ४**

**महाराष्ट्र राज्य कृषी व ग्रामीण विकास जिल्ह्यातील कार्य**

(लाख रुपये)

| बाब | | १९९०-९१ | | १९९६-९७ | |
|---|---|---|---|---|---|
| | | सभासद | रक्कम | सभासद | रक्कम |
| भाग भांडवल | .. | ३५,१८२ | २,५५.७० | ४५,९०२ | ५,२५.७० |

अनुक्रमणिका

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| येणे कर्ज | . . | . . | २८,८६.०१ | ४३,८५८ | ५५,७१.१० |
| कर्ज वाटप :- | | | | | |
| सर्वसाधारण | . . | ३७ | ९.७४ | १७ | ८६.९४ |
| खास योजना | . . | ७७२ | ५,१७.६८ | ९७० | ८,७१.६६ |
| आयआरडीपी | . . | ३२९ | ३५.४७ | १९४ | ३,६३.७२ |
| एनसीडीसी गोडाऊन | . . | ३ | ३८.५२ | . . | . . |
| ग्रामीण कुटिरोद्योग | . . | ६० | १०.१० | २६ | २,२७.०२ |
| ग्रामीण घरबांधणी योजना | . . | . . | . . | ७ | १,०१.९६ |

## तक्ता क्रमांक ५

## जिल्ह्यातील अल्पबचत योजनेची माहिती

(लाख रुपये)

| योजना | | १९८९-९० | १९९१-९२ | १९९२-९३ | १९९६-९७ |
|---|---|---|---|---|---|
| टपाल कार्यालय बचत बँक | . . | १९.३२ | १,०९.७३ | ५०.२९ | ०.५५ |
| संचित मुदत ठेवी | . . | १३.९६ | ११.५३ | १५.६१ | (-) १.९३ |
| पुनरावर्ती ठेवी | . . | ४,०१.१० | ३,२५.२९ | ५,११.८९ | ७,३३.२१ |
| समयबद्ध ठेवी | . . | ४४.०७ | ३.१५ | ६.०३ | (-) १९.९९ |
| सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी | | १,६९.६८ | ३,४३.८६ | ३,५८.६३ | १,६७.३९ |
| राष्ट्रीय बचत प्रमाणपत्रे (८ वी मालिका) | | ३,४८.९७ | ३,११.४५ | ४,१९.९३ | . . |
| राष्ट्रीय बचत प्रमाणपत्रे (२ ते ५ मालिका) | | ४,४३.३९ | ६,६५.४१ | ९,०७.४८ | ७,०३.३१ |
| इंदिरा विकास पत्रे | . . | २,९२.८४ | ६७.१३ | १.८३ | (-) ५५.४७ |
| किसान विकास पत्रे | . . | ११,१०.२१ | १०,८५.९३ | १५,०४.१६ | ५,४५.१६ |
| मासिक प्राप्ती योजना | . . | २,३८.५० | १,५०.३७ | २,५५.३१ | २,८६.३८ |
| राष्ट्रीय बचत योजना, १९८७ | . . | ३,२०.०७ | ५,३४.७१ | ५३.७७ | (-) १,९०.२२ |
| राष्ट्रीय बचत योजना, १९९२ | . . | . . | . . | २७.२८ | १३.५६ |

अनुक्रमणिका

## तक्ता क्रमांक ६

### विनियमित कृषी उत्पन्न बाजारांमधील प्रमुख वस्तूंची उलाढाल, मार्च १९९६

(आवक टनात, किंमत रुपये हजार)

| वस्तू | आवक = आ.<br>किंमत = किं. | सातारा | वाई | लोणंद | कोरेगाव | फलटण | दहीवडी | वडूज | कराड | मल्हारपेठ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| बाजरी | आ. . . | . . | ८ | २७३ | १७ | २,४७५ | १९१ | . . | ४५ | . . |
| | किं. . . | . . | ३५ | १,४७५ | ६१ | १०,४७४ | ३७५ | . . | १५४ | . . |
| खपली गहू | आ. . . | २४ | ५३ | ३११ | ३५ | ३,४२३ | ९५ | . . | १,२९४ | . . |
| | किं. . . | १६८ | ३०६ | २,३३८ | २४२ | १७,८०४ | ४५२ | . . | ११,१७७ | . . |
| ज्वारी | आ. . . | २९ | ८१ | २९८ | ३४ | १,५४९ | ६२८ | . . | २,५९८ | . . |
| | किं. . . | १९२ | ५९ | . . | . . | १७४ | ९१ | . . | २,४८२ | . . |
| हरभरा | आ. . . | ९९ | ३४ | १३६ | १६७ | ४०८ | १० | . . | . . | . . |
| | किं. . . | ७२१ | २७१ | १,१४९ | २,०९१ | ३,३२० | ७३ | . . | . . | . . |
| घेवडा | आ. . . | ६०६ | ४३२ | . . | ३,०७९ | . . | . . | . . | ६८१ | . . |
| | किं. . . | १०,७५० | ७,८०८ | . . | ४१,५६८ | . . | . . | . . | ९,०४२ | . . |

तक्तो

अनुक्रमणिका

### तक्ता क्रमांक ६--चालू

(आवक टनात, किंमत रुपये हजारात)

| वस्तू | आवक = आ. किंमत = किं. | सातारा | वाई | लोणंद | कोरेगाव | फलटण | दहीवडी | वडूज | कराड | मल्हारपेठ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| हळद | आ. .. | २२ | १,९२० | .. | १ | .. | .. | .. | .. | .. |
| | किं. .. | २९६ | २९,३२४ | .. | ३४ | .. | .. | .. | .. | .. |
| कांदे | आ. .. | १,५६२ | .. | २३,०१९ | .. | ७,५१० | .. | .. | ३०७ | .. |
| | किं. .. | ३,९९५ | .. | ६८,६०४ | .. | २७,९३० | .. | .. | २५,१३० | .. |
| गूळ | आ. .. | ३३ | १७६ | .. | .. | ४१६ | .. | ७९ | २५,१३० | .. |
| | किं. .. | २२६ | १,३१६ | .. | .. | ३,३३३ | .. | ५०४ | १,९५,८२० | .. |
| बटाटा | आ. .. | ७०० | .. | .. | .. | .. | .. | .. | १२६ | .. |
| | किं. .. | २,६५० | .. | .. | .. | .. | .. | .. | २५६ | .. |
| भुईमुंग | आ. .. | .. | ४३ | .. | .. | ८४ | .. | .. | १२ | १४ |
| शेंगा | किं. .. | .. | १,१६४ | .. | .. | १,१८४ | .. | .. | ३,०५७ | १,२२८ |

अनुक्रमणिका

**तक्ता क्रमांक ७**

**सातारा जिल्हा खरेदी-विक्री संघ व तालुका खरेदी-विक्री संघ यांची आकडेवारी**

(रुपये हजारात)

| बाब | | १९९०-९१ | | १९९२-९३ | |
|---|---|---|---|---|---|
| | | जिल्हा खरेदी-विक्री संघ | तालुका खरेदी-विक्री संघ | जिल्हा खरेदी-विक्री संघ | तालुका खरेदी-विक्री संघ |
| संस्था | . . | १ | १२ | १ | १३ |
| सभासद | . . | ६९३ | १८,०३१ | ७७४ | १९,३५३ |
| वसूल भाग भांडवल | . . | ८९६ | ७२,८८ | १३,९१ | ९३,७१ |
| राखीव निधी | . . | ४३३ | २९,०२ | ४४९ | ३८,०८ |
| इतर निधी | . . | १३,०५ | ९४,६७ | १४,८३ | १३०,१४ |
| घेतलेले कर्ज | . . | १४,९० | ८७,०८ | ४२८ | ९५,३८ |
| नफा | . . | १७ | ८९८ | ५० | ६४० |
| शेती उपयोगी वस्तूंची विक्री | . . | . . | २,३०,१३ | . . | २,६४,१९ |
| शेती उत्पादन मालाची विक्री | . . | १,७२,१६ | ११,१२,६४ | ३,२२,२८ | ३६,८०,१७ |
| ग्राहकोपयोगी मालाची विक्री | . . | १,१५,१५ | ३,७८,८२ | २,११,५५ | ८,६४,०६ |

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका